# माणूस

शनिवार । ६ ऑक्टोबर १९७९ । ७५ पैसे

## दिवाळी अंक दर्शन : एक

स. न. वि. वि.

सोबत राष्ट्रपती भवनावरचा लेख पाठवीत आहे. तो दिवाळी अंकासाठी आहे. लेख पाठवताना इतकी गडबड झाली, की एक वाक्य लिहायचे राहूनच गेले. लेखाच्या शेवटी खाली कंसात एक वाक्य घालावे – ' श्री. मुकुंद रानडे यांच्या ' A palace in democracy ' या आगामी पुस्तकाच्या आधारे. '

अफगाणिस्थानवरच्या (माझ्या) लेखांचे स्वागत कसे काय होत आहे ?

नुकताच इथे अमीन सत्तेवर आला आहे. त्या संबंधात अजून तरी लिहिणं कठीण आहे कारण Process अजून चालूच आहे. फक्त घटनांची नोंद घेणारा लेख म. टा. कडे पाठवला आहे. परंतु हे वादळ जरा शांत झाल्यावर या घटनांचा शोध घेणारा लेख ' माणूस 'कडे पाठवेन ! ........

काबूल
२३ सप्टेंबर

**प्रतिभा रानडे**

राष्ट्रपती भवनावरचा लेख मिळाला. दिवाळी अंकात घेत आहे. लेखाचा शेवट मनाला फारच चटका लावणारा आहे. कुठल्याही कलाकाराला निर्मिती पूर्ण झाल्यावर असेच वाटत असेल का ? तुमची अफगाणिस्थानवरची लेखमाला तर गाजतेच आहे. पण हा तुमचा व तुमच्या यजमानांचा लेखही मराठी वाचकांना खूप आवडणार आहे. या वास्तुविषयी इतकी माहिती यापूर्वी कुठेच प्रसिद्ध झालेली नाही. त्यात घडलेले कितीएक प्रसंग, राजपुरुषांच्या भेटीगाठी, त्यांचे बोलणे–चालणे–वागणे या लेखामुळे प्रथमच लोकांना कळणार आहेत....

......गांधीजी व्हॉईसरॉयसमोर मांडी घालून कसे बसले...

.......माउंटबॅटन शाही मेजवान्यांपूर्वीच का जेवून घ्यायचा ?

दिवाळी अंकाचे हे एक खास आकर्षण ठरावे....

**– सं.**

## दिवाळी अंकाचे हे एक खास आकर्षण ठरावे

## दिवाळी अंक दर्शन : दोन

जंगलतोडीमुळे ओसाड, नापीक झालेल्या
धुपूनधुपून उजाड बनलेल्या भूमीला
सुजलाम् सुफलाम् बनविणारा
तो होता एक
माती जागवणारा महामानव.
एक निग्रो महर्षी.
तो एकदा म्हणाला...
" निग्रो करू शकत नाहीत अशी गोष्ट या जगात नाही...."
उजाड माळरानावर विद्यापीठ स्थापन करून हताश झालेल्या
बुकर टी वॉशिंग्टनने याला लिहिले....
" मी तुम्हाला पैशाचं, उच्चपदाचं वा कीर्तीचं आमिष दाखवू शकत नाही. पहिल्या दोन गोष्टी तुम्ही उपभोगीत आहात, शेवटची तुम्ही कुठेही मिळवू शकाल यात शंका नाही. मी तुम्हाला या गोष्टींकडे पाठ फिरवायला विनवत आहे. त्यांच्या बदल्यात काम, अविरत कष्ट आणि शतकानुशतके दारिद्र्याने गांजलेल्या दलितांना उद्धारून त्यांना ' सुजाण मानव ' बनविण्याची कामगिरी मी तुमच्यावर सोपवत आहे.... "
बुकर टी वॉशिंग्टनने सोपवलेली कामगिरी तनमनधन अर्पण करून याने अपेक्षेपेक्षाही यशस्वी करून दाखवली. केवळ दलित अमेरिकाच नाही तर सारा देशच तो गेला तेव्हा नतमस्तक झाला, सर्वांनी याला मानवंदना दिली. ' हेराल्ड ट्रिब्यून 'ने लिहिले.......
" अमेरिकेच्या अस्मितेला झळाळी देण्याची अपूर्व कामगिरी यांनी पार पाडलेली आहे........"

## कोण हा ?

### याची समग्र गाथा
### रसाळ आणि रोमांचकारी

## दिवाळी अंक दर्शन : तीन

# लोकशाहीकडून प्रजाप्रभुत्वाकडे एक शोधप्रवास

### लेखक : विनय हर्डीकर

" चिकमगळूर निवडणुकीत ' प्रजाप्रभुत्व ' हा नवीन शब्द सापडला – भारतात आपण आणली ती लोकशाही – लोकांच्या पाठिंब्यावर परत परत शाही प्रवृत्तीच रुजत राहिल्या. इथला ग्रामीण बहुजनसमाज नेहमीच व्यक्तिपूजक होता आणि सुखासीन सुशिक्षित वर्गाला हुकुमशाहीचं प्रलोभन जबरदस्त होतं – totalitarian temptation ! अशा परिस्थितीतून प्रजाप्रभुत्वाकडे जाण्याची स्वातंत्र्योत्तर काळातली पहिली संधी म्हणजे जनता पार्टीचा जन्म —"

### जन्मापासून आजतागायत
### या पक्षाने काय केले ? काय केले नाही ? का ?

दिवाळी अंक दर्शन : चार

बेबस दुनियेमध्ये
असंतोषाची स्वप्ने विकणारा

## अमिताभ

भाऊ पाध्ये

– अमिताभची एक सेन्सेटिव्ह नजर जेव्हा सभोवार फिरते त्यावेळी त्याला अंधारच अंधार दिसतो आणि या बेबस, विराण दुनियेत आपण काही तरी केलेच पाहिजे या निर्धाराने तो स्वत:ला झोकून देतो.
– आपण नपुंसक माणसे. असं काहीतरी आपल्या हातून व्हावं म्हणून आयुष्यभर अंधारात चाचपडत असतो. पेटलेले असतो. परंतु झोकून देताना जिंदगीच्या गहराईमुळे आपण टरकलेले असतो, आणि पडद्यावर दिसतो तो एक असा स्वत:ला झोकून देणारा अमिताभ – आपण मग त्याला टाळचा देतो.

दिवाळी अंक दर्शन : पांच

पॉल गॉलिकोच्या
स्नो गूझ या जगप्रसिद्ध कादंबरीचा
रसिला परिचय

## हिमहंसी

श्रीकांत लागू

ही गोष्ट फार सहज संगतवार सांगता येणं कठीण आहे.
या गोष्टीचे धागेदोरे अनेक ठिकाणांहून अनेक लोकांकडून गोळा केले आहेत.
काही धागे, विचित्र आणि भयानक दृश्ये पाहिलेल्या लोकांकडून गोळा केले आहेत. समुद्राने त्या दृश्यातला आपला वाटा उचलला आहे आणि ती जागा आपल्या चुबुकलाटांनी पांघरून टाकली आहे. तसंच काळी किनार असणाऱ्या पंखांचा एक भला थोरला शुभ्र पक्षी त्या काळीज फाडणाऱ्या प्रसंगाचा प्रथमपासून साक्षी होता. तोही आता उत्तरेकडल्या अंधाऱ्या, गारठलेल्या शांत भूमीकडे परतला आहे. जिथून आला होता तिथे.

## कोण होता तो ?
## काय गोष्ट आहे त्याची ?

शिवाय मान्यवरांचे निवडक लेख, कथा इत्यादी साहित्य

# माणूस : दिवाळी अंक

पृष्ठसंख्या : अंदाजे पाऊणेदोनशे
किंमत : आठ रुपये
प्रसिद्धी : ऑक्टोबर दुसरा आठवडा

# सप्रेम नमस्कार..



□ दि. २२–९–७९ च्या 'माणूस' साप्ताहिकातील श्री. ग. मा. यांचा ' राष्ट्रपती व चरण–चव्हाण यांचे भावी कारस्थान ' या लेखाने देशातील विद्यमान राजकीय परिस्थितीचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन केले आहे. लोकशाहीवाद्यांनी चिंतन व मनन करण्यासारखा हा लेख इतर लोकशाहीप्रेमी वर्तमानपत्रांनी प्रसिद्ध केल्यास बुद्धिजीवी वर्गातील संभ्रम दूर होण्यास मदत होईल.

मतदारांनी कोणाला मत द्यावे ? या प्रश्नाचे उत्तर या लेखातून मिळाले आहे. पण लक्षात कोण घेतो, अशी आज सर्वांचीच अवस्था आहे.

जिकडेतिकडे इंदिरा गांधींच्या हुकूमशाहीची भीती दाखविली जात आहे. महत्त्वाकांक्षी राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डींच्या हालचालीकडे कोणाचेच लक्ष नाही. आगामी निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळणार नाही आणि आपल्याला राष्ट्रीय सरकार या गोंडस नावाखाली स्वतःचे मंत्रिमंडळ बनविता येईल हे राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डींचे स्वप्न आहे.

या निवडणुकीत खऱ्या अर्थाने मर्द असे दोनच पक्ष आहेत. यापैकी एकालाही पुरेसे बहुमत न मिळाल्यास ( तशीच शक्यता अधिक आहे ) चरणसिंगच भारताच्या पंतप्रधानपदी बोकांडी बसतील.

श्री. रेड्डींनी लादलेले पंतप्रधान चरणसिंग सुखासुखी सत्ता सोडतील असे वाटत नाही. सत्तेसाठी काहीही करणारा एवढा लबाड, पाताळयंत्री माणूस कोणत्याही मार्गाने ( व राष्ट्रपती अनुकूल असल्यामुळे ) आपल्या हातची सत्ता टिकवण्याचा प्रयत्न करील.

श्री. नीलम संजीव रेड्डींनी राष्ट्रपतीपदाची शान केव्हाच घालविली आहे. वैयक्तिक महत्वाकांक्षेपोटी या देशावर निवडणुका लादून गरिबांच्या गरिबीत वाढ करणारे राष्ट्रपती म्हणूनच रेड्डींचे इतिहास मूल्यमापन करील. एवढ्या मोठ्या पदावर असलेला माणूसही सत्तेच्या मोहापासून दूर नाही ही या देशाची सर्वात मोठी शोकांतिका आहे. गटबाजी व कटबाजी करून चरणसिंगाच्या मदतीने सत्ता हाती ठेवण्याचा प्रयत्न करणारे श्री. नीलम संजीव रेड्डी यांना भारतीय जनता कदापी क्षमा करणार नाही व राष्ट्रपतींचे स्वप्न साकार होऊ देणार नाही

जनता पक्ष किंवा इंदिरा काँग्रेस यापैकी एकाला निश्चितच बहुमत मिळेल आणि रेड्डींना राष्ट्रपतीपद सोडावेच लागेल. इंदिरा गांधींनी रेड्डींची पात्रता पूर्वीच ओळखली होती. परंतु जनता पक्षाच्या चुकीमुळे रेड्डींना एवढे मोठे पद मिळाले, आता त्याच पक्षावर अन्याय करून रेड्डींनी आपणही चरणसिंगाचे मित्र आहोत हे दाखवून दिले. असे नसेल, तर रेड्डींनी खालील प्रश्नाची उत्तरे जनतेला द्यावीत.

१ : स्वर्णसिंग काँग्रेसला पुरेसे बहुमत लोकसभेत नसताना यशवंतरावांना मंत्रिमंडळ बनविण्यासाठी का पाचारण केले ?

२ : दोघांना एकाच वेळी बहुमत सिद्ध करण्यास सांगणे भारतीय राज्यघटनेला धरून आहे काय ?

३ : यशवंतरावांचा न्याय जगजीवनराम यांना का दिला नाही ?

४ : सर्व पर्याय संपल्यावर निवडणुका घोषित केल्या काय ?

५ : लोकसभेसमोर न गेलेल्या दलबदलू पंतप्रधानाचा सल्ला ऐकणे व त्याच व्यक्तीस ' काळजीवाहू ' म्हणून काम पहाण्यास सांगणे कितपत बरोबर आहे !

६ : ' राष्ट्रीय सरकार ' ही कल्पना घटनेत आहेत काय ? नसल्यास तसा प्रयत्न रेड्डींनी का केला ?

७ : लोकसभा बोलावून निवडणुकीचा निर्णय का घेतला नाही ?

**आर. के. मुधोळकर**

२३ सप्टेंबर नांदेड

□ आपल्या अंकातील श्री. शशिकांत वि. जोशी यांचे श्री. वाजपेयी यांच्या अलीकडील विधानांवर टीका करणारे पत्र वाचून सखेद आश्चर्य वाटले. कारण अगदी अलीकडेच संघ आपल्या संहितेत हिंदू राष्ट्राऐवजी भारतीय राष्ट्र असा बदल करण्याच्या सूचनेवर विचार करीत आहे असे सरसंघचालक बाळासाहेब देवरस म्हणाल्याचे वृत्त आहे. प्रेस ट्रस्टचे वृत्त खरे असो, की खोटे; उद्या सरसंघचालकांनी राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सल्ल्याने, बदलत्या काळानुसार राष्ट्राच्या दृष्टीने कार्यपद्धतीत बदल केल्यास श्री. शशिकांत जोशींसारखे संघाचे स्वयंसेवक कोणती भूमिका घेणार आहेत ? यात तत्वास मुरड घालण्याचा प्रश्न नसून व्यवहार्य भूमिका घेण्याचा आहे. आज जनसंघाला उजवा, प्रतिगामी म्हणून हिणवणारेही 'Small is beautiful' ह्या कल्पनेचा पुरस्कार करताना दिसतात; परंतु ही कल्पना कोणत्या मार्क्सवादात बसते ?


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : एकोणिसावा
६ ऑक्टोबर १९७९
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

जनता पक्षाने स्वीकारलेल्या 'गांधीवादी समाजवादा'च्या मुळाशीही आर्थिक विकेंद्रीकरणाचीच कल्पना आहे, जिचा स्व. दीनदयाळ उपाध्याय यांनी जनसंघाच्या व्यासपीठावरून गेली १०–१५ वर्षे पुरस्कार केला. तेव्हा समाजवादीही बदलेले आहेत. संघानेही थोडी लवचिक भूमिका घ्यावी. प्रश्न आहे तो या दोन घटकातील सामंजस्याचा. देशातील ध्रुवीकरणाची दिशा व गतीही या गोष्टीवरच अवलंबून राहणार आहे.

**सुरेश नारिंग्रेकर**

२५ सप्टेंबर आग्रीपाडा, मुंबई–११

**बंधू !**

आम्हाला जनतेचं राज्य हवं होतं
म्हणून आम्ही 'जनतेला' निवडून दिलं.
ती पण अशी बेईमान निघाली की
सत्तेपुढे वाकली.
राजघाटावरील 'शपथा' या
शपथाच राहिल्या,
महात्माजींचं स्वप्न हे स्वप्नच ठरलं,
जयप्रकाशजींची क्रांतीची घोषणा
हवेतच विरली.
आम्ही फक्त आता म्हणतोय
सारे दगाबाज आहेत,
सत्तेचे लोभी, तत्त्वशून्य,
आणि काय तोंडाला येईल ते
वाटेल तसे बोलतो.
पण एक गोष्ट मात्र सत्य आहे;
कसंही झालं तरी ते आमचेच
बंधू आहेत !
शिक्षण खात्याच्या क्रमिक पुस्तकातील
प्रतिज्ञा आठवा–
'भारत माझा देश आहे. सारे भारतीय
माझे बांधव आहेत.'

**वि. ना. होनप, पुणे**

# निवडणुका

## आघाड्या आणि समझोते

वा. दा. रानडे

निवडणूक समझोते आणि आघाड्या यांना आता बरेच निश्चित स्वरूप येऊ लागले आहे. जनता (एस्), समाजवाद्यांचा एक गट, बिजू पटनाईक यांचा गट यांनी एकत्र येऊन नवा 'लोकदल' पक्ष स्थापन केला; पण बहुगुणा यांच्या नेतृत्वाखालील लोकशाहीवादी कॉंग्रेसचा गट या पक्षात सामील झालेला नाही. आपला गट लोकदलात विलीन झाला नसला तरी त्याला आपला पाठिंबा राहील असे बहुगुणा यांनी सांगितले असले आणि त्यांच्या गटास विलीन करून घेण्याबाबत आणखी बोलणी होणार असली तरी लोकदलाच्या स्थापनेचे प्रसंगीच ही अडचण निर्माण झाल्याने चरणसिंगांच्या नेतृत्वाखालील ही आघाडी कितपत प्रभावी होऊ शकेल अशा शंका निर्माण झाल्या आहेत.

बहुगुणांचा गट बाहेर राहिला यामागे खरोखरच काही तात्त्विक कारणे आहेत की पक्षात आपल्याला अधिक महत्त्वाचे स्थान आणि पक्षाच्या उमेदवार यादीत आपल्या गटास अधिक जागा मिळविणे हा उद्देश त्यामागे आहे ? आपला ३१ कलमी कार्यक्रम नव्या पक्षाने मान्य केला पाहिजे ही विलिनीकरणासाठी बहुगुणा गटाची एक अट होती. या कार्यक्रमात वास्तविक अमान्य करण्यासारखे काही नव्हते. अल्पसंख्याकांना संरक्षण देण्याबाबत नव्या पक्षाने आपले धोरण अधिक स्पष्टपणे जाहीर करावे अशी बहुगुणांची मागणी होती. जातीय दंगली आटोक्यात आणण्यासाठी परिणामकारक उपाय योजले गेले नाहीत अशी त्यांची टीका होती. या दंगली आटोक्यात आणण्यासाठी अल्पसंख्य जमाती, हरिजन यांचेच एक पोलिस दल उभारावे अशी सूचना त्यांच्या कार्यक्रमात केलेली आहे; पण कार्यक्रम मान्य होण्यापेक्षाही नव्या पक्षात बहुगुणांना अधिक महत्त्वाचे स्थान मिळणे आणि उमेदवार यादीत त्यांच्या गटास अधिक जागा मिळणे याच गोष्टी त्यांना अधिक महत्त्वाच्या वाटत असल्या पाहिजेत. चरणसिंगांनी मंत्रिमंडळ बनविले तेव्हाच यशवंतराव चव्हाणांबरोबर बहुगुणांना उपपंतप्रधानपद द्यावे अशी मागणी करण्यात आली होती हे यासंबंधात लक्षात घेतले पाहिजे. वाटाघाटीतून याबाबत तडजोड होऊ शकेल.

नव्या पक्षावर भालोद गटाचा प्रभाव राहणार हे उघड आहे. कारण तोच मोठा गट असून समाजवादी व पटनाईक यांचे गट लहान आहेत. बहुगुणांचा गट याचवेळी नव्या पक्षात विलीन झाला तर भालोद गटाचा प्रभाव कमी करण्याच्या दृष्टीने बाकीच्या दोन गटांना ते हवे होते. नव्या पक्षाचा कार्यक्रम व जाहीरनामा जाहीर झाल्यावर त्यासंबंधी लिहिता येईल; पण भूमिकेसंबंधी जे निवेदन संमत झाले आहे त्यावरून चरणसिंगांच्याच विचारप्रणालीची छाप त्यावर दिसते. आपणच खरे गांधीवादी असल्याचा दावा चरणसिंग करीत असतात. ग्रामीण भागाच्या विकासावर त्यांचा अधिक भर आहे. पहिला किसान पंतप्रधान म्हणून त्यांचा गौरव केला जात आहे; पण ज्या किसानांचे हितसंबंध ते जपतात ते मुख्यतः बडे शेतकरी आहेत. भूमिहीन शेतमजूर, छोटे शेतकरी यांना त्यांनी या वर्षाच्या अंदाजपत्रकात जाहीर केलेल्या सवलतींचा फारसा फायदा मिळालेला नाही हे लक्षात घेतले पाहिजे. हरिजनांचे आपण कैवारी आहोत अशी भूमिका चरणसिंगांना उघडपणे तर घ्यायलाच हवी; पण प्रत्यक्षात हरिजनासंबंधीच्या योजना परिणामकारकपणे राबविणे, त्यांच्या-

वर होणाऱ्या अत्याचारांची त्वरित दखल घेऊन कारवाई करणे याबाबतीत भालोदचे मुख्यमंत्री असलेल्या सरकारांनी फारसे काही केलेले नाही हेही नव्या पक्षाचा विचार करताना लक्षात घ्यावयास हवे.

जनता पक्षापेक्षा नवा लोकदल पक्ष अधिक पुरोगामी, डावीकडे अधिक झुकलेला अशी प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. निवडणुकीत डावे गट त्यांच्याशी आघाडी करणार आहेत; पण तुमचा कार्यक्रम कितीही पुरोगामी आणि क्रांतिकारक असला तरी प्रत्यक्षात तुम्ही तो कसा राबविता यावरूनच तुमची पारख जनता करणार आहे. ज्या राज्यात भालोदचे मुख्यमंत्री होते किंवा आहेत तेथील त्यांची कामगिरी काही याबाबतीत समाधानकारक नाही. एकच ठळक उदाहरण जमीन सुधारणांच्या अंमलबजावणीचे घेता येईल. हरियाना, बिहार, उत्तर प्रदेश या तिन्ही राज्यात बहुसंख्य भूमिहीन अजून भूमिहीनच आहेत. पुरोगामी कार्यक्रम केवळ कागदावरच राहणार असेल तर त्याला काय अर्थ ? तेव्हा केवळ पुरोगामी कार्यक्रमाच्या घोषणांनी जनता यापुढे फसणार नाही. अर्थात हे जनता पक्षालाही लागू आहे. सत्ता हाती आली पण पक्षातील अंतर्गत संघर्षांमुळे कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी झाली नाही. जनता पक्षात फूट पडून दोन अलग पक्ष झाल्यानंतर तरी हे संघर्ष मिटणार आहेत का हा खरा प्रश्न आहे. तात्त्विक भूमिका आणि कार्यक्रमापेक्षा सत्तासंपादनाच्या राजकारणातच राजकीय नेत्यांना रस आहे तोपर्यंत संघर्ष अटळ आहेत. विचारविनिमयातून शक्यतो एकमताने, नाहीतर लोकशाही कार्यपद्धतीने त्यावर तोड काढायला हवी.

निवडणूक आघाड्या होत असल्या तरी केवळ स्वतःच्या बळावर आपण निवडून येऊ असा विश्वास एखाद्या पक्षास वाटत असेल तेथे तो आघाड्यांना तयार होत नाही. मार्क्सवाद्यांनी चरणसिंगांच्या आघाडीस पाठिंबा दिला असला तरी पश्चिम बंगालमध्ये अशी आघाडी त्यांना नको आहे. लोकदल आणि कॉंग्रेस यांची आघाडी असली तरी ओरिसात पटनाईकांचा गट व कॉंग्रेस स्वतंत्रपणे निवडणुका लढविणार आहेत.

दक्षिणेतील राज्ये हा इंदिरा कॉंग्रेसचा बालेकिल्ला मानला जात होता पण तशी परिस्थिती आता राहिलेली नाही. चार राज्यांपैकी फक्त आंध्रप्रदेशात त्या पक्षाचे बळ आहे. कर्नाटकात अरस गट फुटून निघाला व त्यालाच अधिक पाठिंबा असल्याचे दिसून आले आहे. केरळमध्ये यावेळी दोन्ही कम्युनिस्ट पक्ष व इतर डावे गट एकत्र येऊन डाव्यांची जोरदार आघाडी बनत आहे, त्यामुळे तेथे यावेळी इंदिरा कॉंग्रेसला यश मिळणे कठीण आहे. तामिळनाडूमध्ये वास्तविक अण्णाद्रमुक आणि इंदिरा कॉंग्रेस यांची आघाडी व्हावयाची पण तंजावर पोटनिवडणुकीच्या वेळी इंदिरा गांधींच्या यशाची आपण हमी देऊ शकत नाही असे एम्. जी. रामचंद्रन यांनी सांगितले तेव्हापासून त्यांच्यावर व त्यांच्या पक्षावर इंदिरा गांधींचा रोष आहे आणि एकदा एखाद्याबद्दल प्रतिकूल ग्रह मनात झाला तर इंदिरा गांधी तो कायम ठेवतात हा अनुभव चव्हाणांच्या बाबतीत आलेलाच आहे. अण्णा द्र. मु. क.ला विरोध करायचा हे एकदा ठरल्यावर द्र. मु. क. हाच इंदिरा गांधींना जवळचा पक्ष होता. त्याच्यात त्यांनी निवडणूक करार केला आणि जागांच्या वाटणीत आपल्या पक्षास अधिक जागा मिळविल्या; पण अनेक पोटनिवडणुकांचे निकाल लक्षात घेता द्र. मु. कला आता जनतेचा पाठिंबा राहिलेला नाही हे स्पष्ट झालेले आहे. तेव्हा या युतीचा इंदिरा कॉंग्रेसला फारसा पाठिंबा मिळण्याची शक्यता नाही. १९७७ च्या निवडणुकीत दक्षिणेतल्या चार राज्यात कॉंग्रेसने १२९ पैकी १४ जागा जिंकल्या होत्या पण तीन राज्यातील प्रतिकूल परिस्थिती लक्षात घेता यावेळी तेथे साठ–पासष्टपेक्षा अधिक जागा इंदिरा कॉंग्रेसला मिळणे कठीण दिसते. □

## वर्गणीदारांसाठी सूचना

वर्गणीदारांना दिवाळी अंक वर्गणीतच दिला जातो. ज्यांना दिवाळी अंक रजिस्टर्ड पोस्टाने पाहिजे असेल त्यांनी ८ ऑक्टोबरपूर्वी २ रुपये ७५ पैसे पाठवावेत.

अंक व्यवस्थित मोजून पोस्टाचे ताब्यात दिले जातात. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी. तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असेल तर अवश्य पाठवू

ज्यांची वर्गणी ६ ऑक्टोबरला संपली असेल व ज्यांची पुढील वर्षाची वर्गणी जमा नसेल त्यांना दिवाळी अंक पाठविला जाणार नाही.

जे वर्गणीदार कार्यालयातून दिवाळी अंक नेणार असतील त्यांनी ८ ऑक्टोबरपूर्वी तसे कळवावे.

–व्यवस्थापक 'माणूस'

आ. डॉ. अरविंद लेले यांच्या लेखावरील प्रतिक्रिया

# दुहेरी तर्कनिष्ठा की प्रच्छन्न पलायनवाद ?

प्रा. मुकुंद इनामदार, शिरूर

'अटलजींची भरारी पंखहीन ठरणार काय ?' या माझ्या लेखास उत्तर म्हणून आमदार डॉ. अरविंद लेले यांनी 'अटलजींचे निमित्त करून संघावर केलेली जुनीच टीका,' हा प्रतिटीका करणारा लेख साप्ताहिक 'माणूस'मधून प्रसिद्ध केलेला आहे. एका संघनिष्ठ व राजकीय क्षेत्रातील जबाबदार व्यक्तीचे लिखित उद्‌गार या दृष्टीने उत्तराची अपेक्षा होतीच. मी गृहीत धरलेल्या बहुतेक सर्व प्रतिक्रियांना अगदी अनुकूल प्रतिसाद दिल्याबद्दल स्वतःवरच खूष व्हावे की 'आम्ही कसले जुने, आमच्यावरची टीकाच जुनी' असे बिनतोड (!) व सदाबहार उत्तर संघाच्या गोटातून आल्यामुळे सखेद आश्चर्य करावे, यात वेळ न घालविता विचाराचे वर्तुळ माझ्यापुरते पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो खुलासा–टिप्पणी करण्याचा प्रयत्न करतो. हे करत असताना तारापूरहून श्री. शशिकांत जोशी यांनी 'माणूस'ला पाठविलेल्या पत्राचीही (दि. २२ सप्टेंबर अंक) दखल घेणे योग्य ठरेल असे वाटते.

□ माझ्या संपूर्ण विवेचनाचा डोलारा अटलजींचा लेख (त्यातील संघाशी संबंधित शेवटचा भाग) व तरुण-भारत (दि. १२ ऑक्टो.) मधील 'विदूर' यांचा लेख यावर उभारलेला आहे. हे दोन्ही लेख अतिशय गंभीरपणे व काळजीपूर्वक लिहून प्रसिद्ध केले आहेत अशी माझी धारणा आहे. 'शतकातून एकदाच येणाऱ्या' पेचप्रसंगावर वाजपेयी भाष्य करीत आहेत, तर विदुरांनीच म्हटल्याप्रमाणे 'वाजपेयींच्या शंका प्रामाणिक व सद्‌बुद्धीतून घेतलेल्या आहेत. त्यांची गंभीरपणे दखल घेतली पाहिजे.' 'हिंदुराष्ट्र, भारतीय राष्ट्रवाद व वाजपेयी' हे लेखाचे नावसुद्धा विदुरांनी वाजपेयींचे म्हणणे गंभीरपणे विचारासाठी घेतले आहे असेच सुचविते. हे सगळे सूर्यप्रकाशाइतके स्पष्ट असताना वाजपेयींच्या लेखाला प्रकट चिंतन, निर्णायक नसलेले चिंतन, असे सोयीस्कर, संदिग्ध नाव देऊन आणि 'विदुरा'च्या लेखाबाबत 'काही तरी आधार म्हणून घेतलेला लेख' असा नकळत दुस्वास करून डॉ. लेले यांनी त्या उभयतांविषयीचा आदरही वाढविला नाही की, संघविचाराचा ढासळता बुरुजही नीट सावरला नाही. वाजपेयींच्या आवाहनाला प्रचंड प्रतिसाद किंवा प्रखर प्रतिवाद घेऊन डॉक्टरसाहेब येतील असे वाटले होते. पण ज्या आधारलेखांबाबत हा वैचारिक संघर्ष आहे त्यांच्याविषयी वर दाखविल्याप्रमाणे इतके धरसोडीचे मतप्रदर्शन करून त्यांनी फक्त वैचारिक मतलबीपणाचे दर्शन घडविले आहे. एकदा वाजपेयींच्या लेखाला 'प्रकट चिंतन' म्हटले की, वाजपेयींनी संघास परखड आवाहन केले आहे असे दिसत असतानाही 'त्यांनी संघाला मुळीच ऐकविलेले नाही' अशी अगदी सहज पळवाट काढता येते. ज्यांना अशी दुहेरी तर्कनिष्ठा चालते, त्यांना दुहेरी निष्ठा व दुहेरी सदस्यत्व साधणे कठीण का जावे ! ते असो. 'प्रकट चिंतनाचे' आकर्षक व सोयीचे लेबल लावून डॉक्टरसाहेबांनी थेट आरंभापासूनच 'पलायनवाद' स्वीकारला आहे आणि विशेष म्हणजे वैचारिक पातळीवर त्यांना 'यशस्वी माघार'ही घेता आलेली नाही.

□ वस्तुतः माझ्या लेखात मी जो मध्यवर्ती प्रश्न उपस्थित केला आहे तो असा की, संघाने पुरविलेल्या राजकीय नेतृत्वाच्या inside-perspective (view) चा, (वाजपेयींच्या) दृष्टीचा, संघ काही विचार करणार की नाही ? आढेवेढे घेत लेलेसाहेब मान्य करतात की, (वाजपेयीच काय पण) संघ परिस्थितीला हुंकार देतो आहे व वाजपेयींच्या लेखावर चर्चाही होईल. पण आपल्या संपूर्ण टीकालेखात त्यांचा अट्टाहास असा की, वाजपेयींनी संघाला ऐकविले एवढे मात्र म्हणू नका. पक्षी निश्चेष्ट होऊन कायमचा पडलेला असू देत, त्याला तो 'मेला' असे म्हणता कामा नये. प्रदीर्घ राजकीय वाटचालीत पहिल्याच वेळी सत्तेत सामील झाल्याच्या बहुमोल अनुभवानंतरही अटलजींनी संघाला सांगितलेले दोन शब्द 'नव्याने' ऐकवल्यासारखे नाहीत, हे संघाचे म्हणणे केवळ संघटनात्मक अहंकाराचेच द्योतक असू शकते. वाजपेयींनी योग्य त्या ऐतिहासिक प्रसंगी दोन शब्द ऐकविण्याचे धैर्य दाखविले म्हणून वाजपेयी व संघटनेतील इतरेजन यांच्यात जो उघड फरक दिसतो तो दाखविल्याने बिचकून जाऊन डॉक्टरसाहेबांनी 'वाजपेयी, विदूर व आम्ही' एकाच विचाराचे आहोत, ही जपमाळ ओढावयास सुरुवात केली आहे. समाजातील अनेक संघटनांत अशी वस्तुस्थिती असू शकते. दिव्यत्वाच्या पायरीशी पोचलेले गांधीजी व त्यांचे अनुयायी एकाच संघटनेखाली नांदले तरी त्यांच्यातला फरक संघटनेच्या इतिहासकाराला यथार्थपणे सांगावाच लागेल. 'काकः काकः पिको पिकः' ही जर वस्तुस्थिती असेल, तर एकाची प्रशंसा व अन्यांची निंदा करणे सर्वस्वी न्यायाला सोडून आहे असे म्हणता येणार नाही.

### न्यूनता की भरीव चुका

वाजपेयींनी संघाचे म्हणून जे दोष सांगितले आहेत त्याची संघाला जाणीव आहेच, असे आमदारसाहेबांनी अगदी खास शैलीत सांगितले आहे; पण गंमत अशी की, विशुद्ध संघविचार पटवून देण्याच्या अभियानात संघ अपुरा पडत आहे, एवढीच न्यूनतामूलक चिकित्सा करून ते सुरक्षितपणे थांबतात. वाजपेयी ही न्यूनता दाखवितातच; पण त्यापुढे जाऊन संघाने राजकारणग्रस्त राहून भरीव चूक ( Error of Commisson ) केली आहे, असे त्यांचे निदान आहे. या त्यांच्या निरीक्षणालाही 'छे, त्यांनी आम्ही म्हटले तेच म्हटले आहे' असे आमदार लेले यांना म्हणावयाचे असेल, तर त्यांच्या अजब सर्वसमावेशक वृत्तीपुढे विनम्रच व्हायला हवे. 'मान ना मान मैं तेरा मेहमान' ही वृत्ती व्यवहारात अनुभवास आल्यामुळे हिंदीत तशी म्हण पडली असावी असे वाटत होते; पण वैचारिक क्षेत्रातही इतके 'चिकाटीचे पाहुणे' वावरत असतील असे ठाऊक नव्हते. आता खात्रीच पटली आहे.

वाजपेयी, काहीजणांना संघाविषयी प्रामाणिक शंका असू शकतात असे प्रांजलपणे कबूल करतात. लेलेसाहेब संघाविषयीच्या शंका प्रामाणिक आहेत असे समजत नाहीत, तर त्या तथाकथित बुद्धिवंतांनी निर्माण केलेल्या असतात, असे त्या शंकांचे गुणवर्णन करतात.

श्रीयुत वाजपेयी व आमदार लेले यांच्यामध्ये फरक आहे तो हाच. हे दोन्ही दृष्टिकोण एकच आहेत असे म्हणणे व वाजपेयींवर तो अभिरोपित करणे म्हणजे वाजपेयी दांभिक आहेत असे म्हटल्यासारखे होईल. आपल्या प्रतिपादनातून एवढा भयंकर अर्थ लेलेसाहेबांना अभिप्रेत नसेल अशी आशा आहे. वाजपेयींच्या ज्या प्रांजळपणावर त्यांचे राजकीय विरोधकही भ्रमराप्रमाणे लुब्ध होतात, त्याच्याशी लेलेसाहेबांनी जरूर नाते जोडण्याचा प्रयत्न करावा; पण तो त्यांना ' आपुल्यासारखे करिती तात्काळ' या रीतीने नव्हे !

आता 'फुटकळ' वाचन वगैरेसंबंधी थोडे बघू. माझे विचार व्यक्त करताना माझ्यासमोर प्रामुख्याने अटलजींचा व विदुरांचा संबंधित लेख या दोन गोष्टी होत्या. अटलजींचा इतर सहचरांबरोबरचा प्रवास अभ्यासणे, विदुरांच्या वाटचालीचा मागोवा घेणे एवढे करून नंतर प्रतिक्रिया व्यक्त करायला हवी. म्हणजे सखोल, व्यापक, प्रगल्भ इ. विवेचन झाले असते असे आमदारसाहेबांचे म्हणणे दिसते. त्यांच्या टीका-लेखाच्या शेवटीशेवटी मला ज्या दोन प्रेमळ सूचना आहेत. (१. संघाच्या मर्यादा, तंत्र समजून घ्याव्या. २. व्यापकपणे, साकल्याने विचार मांडावा. ) त्या सर्वांची बेरीज केली म्हणजे, 'हे वत्सा, तुला संघही कळला नाही व वाजपेयीही कळले नाहीत. त्यासाठी तू संघशाखेवरच येत जा कसा ?' असा गर्भित सूर दिसतो. काही गोष्टी आपल्या जन्माच्या आधीपासूनच्या आहेत, त्या आपणास कशा माहीत होणार आणि कळणार तरी कशा ? हा युक्तिवाद वरवर पहाता नामोहरम करणारा वाटतो खरा; पण तर्कशास्त्रात यालाच अज्ञान-प्रतियुक्ती (दुसऱ्याच्या अज्ञानाचा (गैर) फायदा घेऊन केलेला युक्तिवाद) असे म्हणतात. त्याचे अतिशय प्रभावी उदाहरण समोर ठेवल्याबद्दल मी आमदारसाहेबांचा आभारी आहे.

संघ–जनसंघावर चिखलफेक करण्यासाठीच लेखकाने अटलजींचे निमित्त करून लेखाचा प्रपंच केला आहे, असा डॉ. लेलेसाहेबांनी शेवटी स्पष्ट आरोप केला आहे. हा हेतूचा आरोप असल्यामुळे त्याचे उत्तर देतो. माझ्या लेखाच्या शेवटी 'एकाधिकारशाहीच्या विरुद्ध लढण्यात संघाने लवचिकता दाखवायला हवी होती, हवी आहे.' असे म्हणून एकाधिकारशाहीशी विरोधच दाखविला आहे. एका परिच्छेदात रा. स्व. संघाच्या धोरणाची कॉंग्रेसबरोबर तुलना करताना कॉंग्रेसच्या सत्ताबाजपणाचा उघड उपहास केला आहे. चरणसरकार हे हातापायावरून वारे गेलेले सरकार आहे, असे स्पष्टच म्हटले आहे. या सर्व गोष्टींवरून सहज स्पष्ट होईल की लेखकाचा कल मूलतः जनतानिर्मित पक्षाकडेच आहे, ज्यात संघ–जनसंघाचेही योगदान आहे. असे असताना (चलनी भाषेतील शब्द वापरायचा तर) लेखक संघाचा शत्रू क्र. १ आहे, अशी कल्पना करून त्यावर टीकालेख लिहिणे हे संघाच्या संशयग्रस्ततेचेच फलित आहे. वाजपेयी विरुद्ध संघ असे संघाच्या कुटुंबांतर्गत मतभेद होऊ शकतात, याच धारणेवर माझ्या संपूर्ण लेखाची मांडणी झालेली आहे. तेव्हा संघावरील टीकाकार तो शत्रू ही भूमिका आमदारसाहेबांनी घेतली यात संघाच्या गाळीव असहिष्णू वृत्तीखेरीज दुसरे काय दिसते ? अशा असहिष्णू वृत्तीतून आपल्या भूमिकेचा चांगला बचावही होत नाही व उथळपणा, सवंगपणा अशी प्रतिपक्षावर टीका करण्यात केवळ कंटाळवाणी पुनरावृत्तीच होते, हेही लक्षात येत नाही. आमदारसाहेबांजवळ असलेली सवंग, उथळ, पलायनवादी इ. विशेषणे त्यांनी नेमकेपणाने आणि जरूर तेवढीच वैचारिक क्षेत्रात वापरावयास हवीत, हे मी मुद्दाम सुचविले पाहिजे असे नाही. या शब्दांचा मुक्तपणे वापर करण्यासाठी त्यांना लवकरच प्रचारसभांचे क्षेत्र खुले होणार आहे.

'इनामदारांनी श्री. वाजपेयींच्या विचारांची मूलचिकित्सा केलेली नाही अगर त्यांच्या अंत:प्रेरणेची स्पंदने टिपली नाहीत' असा आमदारसाहेबांनी भात्यातील शेवटचा बाण सोडला आहे. मला नम्रपणे सांगितले पाहिजे की, वाजपेयींचे समग्र तत्त्वज्ञान अगर जीवनचरित्र लिहिण्यास मी बसलो नाही. फक्त त्यांच्या अलीकडच्या सुस्पष्ट आवाहनाचाच मला परामर्ष घ्यावयाचा होता. तेव्हा मूलचिकित्सा वगैरे मुद्दा हमखास भेंडसाविणारा म्हणून उपस्थित केलेला असला तरी येथे निव्वळ गैरलागू आहे. वाजपेयींनी एका महत्त्वाच्या ऐतिहासिक प्रसंगी जे विशिष्ट निवेदन केले तेवढ्या आणि फक्त तेवढ्याच बाबतीत एक वैचारिक चकमक घडविणे हाच माझा साधा–सरळ हेतू होता; पण माझा लेख म्हणजे समस्त संघ परिवारावरील सर्वंकष हल्ला आहे, असे समजून आमदारसाहेबांनी अगदी प्राणपणाने 'जेहाद' पुकारला आहे. लेलेसाहेब म्हणतात त्याप्रमाणे इनामदारांना वाजपेयींविषयी खरे प्रेम नसेलही; परंतु वाजपेयी 'आपलेच' तेव्हा त्यांचे विचार आपल्याहून भिन्न असतीलच कसे, हा भ्रमही त्यांच्याजवळ नाही. आपल्या विवेचनात तेवढी वस्तुनिष्ठता मी अवश्य ठेवली आहे; पण 'मूलगामी, सखोल, व्यापक, प्रगल्भ' इ. प्रकारची चिकित्सा करा असे म्हणताना आमदारसाहेबांनी या विषयाबाबतची वस्तुनिष्ठता पूर्णपणे गमावली आहे, असे खेदाने म्हणावेसे वाटते.

## पर्यायी राष्ट्रीय पक्षाचे पुढे काय ?

डॉ. लेले यांच्या या प्रतिटीकालेखाचा बोधार्थ कोणता ? संघनिष्ठांबाबतचे माझे काही अंदाज या निमित्ताने अगदी निश्चितार्थाने खरे ठरले. वाजपेयींच्या वैचारिक फडफडीने संघस्थानावर भूकंप होणार नाही व त्यांच्या उदार विचाराचा घोडा तेथेच ठाणबंद होईल, हे स्पष्ट झाले. चर्चा व हुंकार देण्याचे आश्वासन हे आज तरी भाषेचे अलंकरण आहे. वाजपेयींची राजकीय अंत:प्रज्ञा बोलेल, पण त्यांचे हातपाय बांधलेलेच राहतील. संघाचा कल त्यांच्या बाजूचा नाही. ही माझी सिद्धान्तकल्पनाही दुर्दैवाने सत्यतेच्या निकट जाईल असे दिसते. संपूर्ण केंद्रीय सत्तेचा राजशकट एका हातून दुसऱ्या हाती (कदाचित् दुष्ट हाती) जाण्याची वेळ येऊन ठेपली व शतकातून एकदाच उद्भवणारा राजकीय पेचप्रसंग उभा ठाकला, तरी संघ व संघाचे प्रवक्ते आपली वैचारिक स्थितप्रज्ञता कायम ठेवणार असे दिसते. निवडणुका होऊन जाईपर्यंत संघाविषयीचा प्रश्न पोतडीत गुंडाळून ठेवायचा, त्यावर अक्षरही काढायचे नाही असे धोरण जनता गोटात स्वीकारल्याचे प्रकट झाले आहेच.

राजकारण हे संघाच्या राष्ट्रजीवनाचे उपांग खरेच. पण राष्ट्रजीवनाच्या अंगप्रत्यंगातून अभिसरण व्हायचे तर त्या अंगाचे वेळो-

पृष्ठ १३ वर

# छी छी ! पुलोदच्या पुरोगामी राजवटीत सुद्धा असे व्हावे ?

## १४ सप्टेंबर : शहादा अश्रुधूर : पुणे १४४ कलम

मुंबईला महाराष्ट्रातील सर्व कामगार संघटनांच्या कृती समितीने एक परिषद ४ ऑगस्टला घेतली होती. महाराष्ट्रातील कामगार विरोधी काळा कायदा, औद्योगिक संबंध विषयक बिल, महागाई, शेतमजुरांचे किमान वेतन इ. प्रश्न घेऊन १४ सप्टेंबरला महाराष्ट्र बंदचा कार्यक्रम ठरला. त्यानंतर बऱ्याच राजकीय उलथापालथी झाल्या व बंदचा कार्यक्रम स्थगित ठेवून केवळ निदर्शने करण्याचे ठरले. कृती समितीच्या आदेशानुसार महाराष्ट्रात बऱ्याच ठिकाणी निदर्शने झाली. शहाद्याच्या श्रमिक संघटनेच्या मोर्चावर निर्घृण लाठीहल्ला झाला, पुण्यामध्ये कामगारांनी एकत्र येऊन निदर्शन करू नयेत म्हणून १४४ कलमाचा वापर झाला. या दोन्ही घटना अतिशय विचार करायला लावणाऱ्या आहेत. महागाई दिवसेंदिवस वाढत आहे, त्याविरोधी हालचालीला आता हळूहळू सुरुवात झाली आहे. यावेळी आलेला शासकीय दमनयंत्रणेचा हा अनुभव पुन्हा ७४ सालच्या दडपशाहीची आठवण करून देणारा आहे.

□

कृती समितीच्या आदेशानुसार शहाद्याच्या श्रमिक संघटनेने शहादा, तळोदा, अक्कलकुवा, नंदुरबार या चार ठिकाणी मोर्चे संघटित केले होते. मोर्चाने तहसील कचेरीवर जाऊन आपल्या मागण्यासंबंधी तहसीलदारांना निवेदन देण्याचा कार्यक्रम होता. शहाद्याला श्रमिक संघटनेच्या कार्यालयापासून २॥ हजारांचा मोर्चा अतिशय शांतपणे निघाला. मोर्चा गावातून फिरून तहसील कचेरीजवळ आला मोर्चा अतिशय शांतपणे झाला. तहसील कचेरीपासून १०० यार्डावर मोर्चा अडविण्यात आला. वास्तविक मोर्चा तहसील कचेरीच्या गेटपर्यंत जाईल व तहसीलदारांना निवेदन देण्यात येईल असा कार्यक्रम पोलिसांना आदल्या दिवशीच दिला होता. यावर पोलिसांनी कोणतेच आक्षेप घेतले नाहीत. त्यापूर्वीही अनेकदा श्रमिक संघटनेचा मोर्चा तहसील कचेरीच्या गेटपर्यंत गेला होता ही पहिलीच वेळ नव्हती. मोर्चा १०० यार्डावर अल्यावर कार्यकर्त्यांनी मोर्चाला गेटपर्यंत जाऊ द्यावे अशी विनंती केली. काही कार्यकर्ते मोर्चातील लोकांना खाली बसवण्याचे काम करीत होते. हे काम चालू असतानाच पोलिसांनी बेछूट लाठीहल्ल्याला सुरुवात केली आणि एवढेही पुरेसे नव्हते म्हणून अश्रूधुराची ११ नळकांडीही फोडली. श्रमिक संघटनेच्या मोर्चावरचा पोलिसांचा हल्ला पूर्वनियोजित होता. राजकीय चिथावणीने झालेला होता. भुरीबाई, जयसिंग माळी, कुमार शिराळकर आदी कार्यकर्त्यांवर मोर्चाच्या सुरूवातीपासूनच पोलिसांनी लक्ष ठेवून लाठीहल्ल्याचं मारहाणीचं लक्ष्य या प्रमुखकार्यकर्त्यांना केलं होतं. इतका हा लाठीहल्ला पूर्वनियोजित होता.

### पोलिस रक्षक की भक्षक ?

या सर्व घटनेमध्ये पोलिसांचे वर्तन सुरूवातीपासूनच उद्दामपणाचे होते. मोर्चावर लाठीहल्ला आणि अश्रुधूर झाल्यावर पोलिसांनी जयसिंग माळी व कुमार शिराळकर या प्रमुख कार्यकर्त्यासह एकूण २४ जणांना ताब्यात घेतले. दि. १४ ला दुपारी ३ च्या सुमारास ताब्यात घेतल्यानंतर पोलिसांनी या सर्वांना ज्युडि. मॅजिस्ट्रेट समोर हजर केले ते दि. १५ च्या पहाटे चार वाजता आणि पहाटे चार पर्यंत कार्यकर्त्यांना शिवीगाळ चालू होती. कार्यकर्त्यांना झोपू दिले जात नव्हते शहाद्यात मॅजिस्ट्रेट नसल्याने त्यांना तळोद्याला नेण्यात आले. या २४ जणांपैकी काहीजण चांगलेच जखमी झाले होते. त्यांच्या जखमा इतक्या खोल होत्या, की नंतर टाके घालावे लागले. एवढया जखमा होऊनही दुपारी ३ ते ४ पर्यंत या कार्यकर्त्यांना औषधोपचार करण्याचे सौजन्यही पोलिसांनी दाखवले नाही. तळोद्याच्या ज्युडि. मॅजिस्ट्रेटकडे कार्यकार्यकर्त्यांनी तक्रार केली आणि या तक्रारीनंतर कोर्टाने हुकुम केला म्हणून औषधोपचाराची दखल घेण्यात आली. पोलिसांनी लाठीमार व अश्रुधुराला सुरुवात केल्यावर लोक वाट फुटेल तिकडे पळत सुटले. काही तहसील कचेरीच्या आत पळाले. तहसील कचेरी जवळच पाट आहे. या पाटामध्ये अनेक स्त्रीपुरुष पडले. काही पाट ओलांडून एस्. टी. स्टॅंडकडे पळाले. येथील लोकांना अश्रुधूर हा नवीनच प्रकार असल्याने गोळीबारच झाला असे वाटले. पोलिसांनी सर्वांचा दोन दोन फर्लांगपर्यंत पाठलाग केला. श्रमिक संघटनेच्या ऑफिसमध्येही पोलीस गेले. पोलिसांच्या मारहाणीने जखमी झालेले काही तेथे बसले असता त्यांनाही लाठीने बेदम झोडपण्यात आले. लोक ऑफिसजवळील शेताशेतातून पळून गेले. पळून जाणाऱ्यांपैकी काहींचा पोलिसांनी जीप गाडीतून पाठलाग करून, त्यांच्या पाठीला संगीन लावून, त्यांना अक्षरशः गाडीत फेकण्यात आले. बंदुकीच्या संगिनीची काशीनाथ भिल ह्याच्या हाताला मोठी जखम झाली आहे. देवीसिंग नावाच्या कार्यकर्त्यास भयंकर मारहाण झाली आहे. याच्या पाठीवर गुडघ्यावर पोलिसांनी बेछूट मार दिला व माराने होणाऱ्या वेदनेमुळे तो रात्रभर विव्हळत होता. परंतु त्याला शहाद्याच्या दवाखान्यात नेल नाही.

पोलिसांनी कांगावा भरपूर केला. ही घटना घडल्यानंतर कलेक्टर व डी. एस्. पी. येत आहेत असे कळल्यानंतर डी. वाय. एस्. पी. शहाद्याचे फौजदार, जमादार व अन्य पोलीस दवाखान्यात जाऊन हाताला पट्टया बांधून

आले आणि १५ तारखेला सकाळी जेव्हा अटक केलेल्यांना तळोद्यातून शहाद्यात आणले तेव्हा त्या सर्व पट्ट्या गेलेल्या होत्या. सगळीकडे बातमी मात्र अशी, की डी. वाय्. एस्. पी-सकट पोलिसही जखमी ! लाठी हल्ला, अश्रुधूर सुरू झाल्यावर अनेकजण चपला टाकून पळाले, पोलिसांनी या सर्व चपला गोळा केल्या. त्याचा ढीग करून 'आदिवासींनी आम्हाला चपला फेकून मारल्या' असा कांगावा करण्यात आला. या सर्व मारहाणीमध्ये किमान १०० स्त्री पुरुष जखमी झाले आहेत.

पोलीस अधिकाऱ्यांचे वर्तन केवळ उद्दामपणाचे आणि कांगावखोरीचे नव्हते तर ते दुटप्पीही होते ! शहादे तहसील कचेरीसमोर शहादा साखर कारखान्याच्या निवडणुका त्वरित घेण्यात याव्या अशी मागणी करून ११ सप्टेंबरपासून शेतकरी चक्री उपोषणाला बसले आहेत. हे उपोषण तहसील कचेरीपासून १०० यार्डाच्या आत चालू आहे. पोलिसांना, तहसीलदारांना व अन्य सरकारी अधिकाऱ्यांना हे शेतकरी १०० यार्डाच्या आत असले तरी चालतात पण श्रमिक संघटनेचा मोर्चा मात्र १०० यार्डाच्या बाहेर पाहिजे. १०० यार्डाच्या आत उपोषण करणाऱ्यांना पोलीस बोटही लावू शकले नाहीत, श्रीमंतांना आणि गरिबांना कशी दुटप्पी वागणूक मिळते त्याचं हे उदाहरण. एकाला १०० यार्डाच्या आत आणि कष्टकरी जेव्हा आत येण्याचा प्रयत्न करेल तर त्याला लाठी आणि अश्रुधुराचा प्रसाद ! पोलिसांच्या या वागणुकीमागे कोणाचा हात आहे ? पोलिसांना कोण चिथावणी देत आहे ?

याहूनही अतिशय गलिच्छ, निंद्य, सरकारी अधिकाऱ्यांच्या बेपर्वाईचा आणि बेजबाबदारपणाचा कळस करणारी घटना धुळ्याला झाली. धुळ्याला पोलीस जनसंपर्क समिती आहे. या समितीतर्फे कसलाही जनसंपर्क होत नसून ती समिती बोगस, दिखाऊ आहे याचं प्रत्यंतर धुळ्याच्या जनतेला आलं. या समितीवर धुळ्याचे कलेक्टर अध्यक्ष, जिल्हा पोलिस प्रमुख सेक्रेटरी म्हणून काम पहातात. उरलेले तीन सभासद बिगर सरकारी आहेत. ते तिघे म्हणजे एन्. सी. पाटील, रतनभाऊ चौधरी आणि प्रा. जे. जी. खैरनार. दि. १७ सप्टेंबरला या जनसंपर्क समितीची बैठक झाली. या बैठकीत बिगर सरकारी सभासदांनी शहादे लाठीमार गोळीबार प्रकरणी अध्यक्षांनी वा सेक्रेटरींनी केवळ माहिती पुरवावी अशी विनंती केली असता 'आम्हाला काहीही सांगायचे नाही' असे म्हणून अध्यक्षांनी सभा संपल्याचे जाहीर केले. सभासदांना साधी माहिती सुद्धा पुरवली जात नाही. ही समिती राज्य शासनाने नेमलेली आहे. या असल्या जनसंपर्क समित्या किती कुचकामी आहेत, याला जबाबदार कोण याचा शासन केव्हा विचार करणार आहे ?

पोलिसांच्या मानभावीपणाचा, धूर्ततेचा दुसरा कळस म्हणजे १४ तारखेला अश्रुधूर व लाठी हल्ला झाल्यावर तब्बल ८० तासांनी जिल्हा पोलीस प्रमुखांनी प्रसिद्धी पत्रक काढले. त्याचा सूर अर्थातच अश्रुधूर व लाठी हल्ल्याचे समर्थन करणारा होता. ८० तासांनी हे पत्रक प्रसिद्ध करून स्वतःच्या कृत्याचे समर्थन करण्याची गरज पोलिसांना का वाटली ? धुळे जिल्ह्यामध्ये गेल्या १ वर्षात पोलिसी अत्याचाराच्या, पोलिसांच्या अरेरावीचा दडपशाहीचा अनुभव देणाऱ्या बऱ्याच घटना घडल्या आहेत. काही महिन्यापूर्वी लोटन पांचाळ नावाच्या एका इसमास कस्टडीमध्ये पोलिसांनी इतकी मारहाण केली, की त्याला तेथेच मरण आले. ही घटना नंदुरबारची. पिशी भालेर नावाच्या गावात एका बाईवर बलात्काराचा प्रयत्न केला गेला. ती बाई तक्रार नोंदवण्यास गेली असता तिची तक्रारही नोंदवून घेण्यात आली नव्हती.

अमळथ्याला झालेला प्रकार तर सर्वज्ञात आहे. (पहा : 'माणूस' अंक २८ एप्रिल व ५ मे ७९) ग्रामस्वराज्य समितीच्या उल्हास राजज्ञ व अन्य कार्यकर्त्यांना पोलीसांनी कशी वागणूक दिली त्याचा सविस्तर अहवाल 'माणूस'च्या वाचकांना माहीत आहेच. अमळथ्याच्या दलितांनी कष्ट करून उभ्या केलेल्या, माणसांपर्यंत आलेल्या पिकात गुरे घालून पीकं तोडून नेली तरी तिथल्या धनदांडग्यावर पोलिसांची लाठी उठू शकली नाही आणि जाब विचारायला गेलेल्या दलितांना आणि ग्रामस्वराज्य समितीच्या कार्यकर्त्यांना मात्र शिवीगाळ, मारहाण, अटक झाली ! या सर्वांमुळे जिल्ह्यातील सर्वसामान्याला पोलिसांबद्दल फार तिडीक आहे. पोलिसांनी आपणहून समर्थन द्यायचे कारण म्हणजे धुळ्यातील राजकीय पक्ष. कामगार कर्मचारी संघटनांनी या घटनेची त्वरीत नोंद घेतली. या घटनेची न्यायालयीन चौकशी व्हावी अशी मागणी केली. आपला महाराष्ट्र संपादक व मराठी पत्रकार परिषदेचे कार्याध्यक्ष भाई मदाने यांनी ताबडतोब घटनास्थळी भेट दिली व कार्यकर्त्यांच्या सुटकेसाठी स्वतः जामीन राहिले. दै. आपला महाराष्ट्रने पोलिसी अत्याचारावर टीकेचा भडिमार चालू केला, त्यामध्ये सविस्तर बातम्या येऊ लागल्या. धुळ्यामध्ये सर्व संघटनांच्या कृतिसमितीने निषेधमोर्चा, उपोषण पत्रके, सभा इ. कार्यक्रम अतिशय त्वरित घेतले.

□

वास्तविक ही निदर्शने शेती महागाईविरोधी औद्योगिक संबंध विषयक विधेयक विरोधी ! कामगार संघटनांच्या कृती समितीने मुंबईच्या परिषदेमध्ये दिलेल्या आवाहनास साद म्हणून हा मोर्चा काढण्यात आला होता. शहाद्यामध्ये कष्टकऱ्यांच्या मोर्चाला ही वागणूक मिळाली तर पुण्यामध्ये निराळाच प्रकार झाला आहे. गेल्या काही वर्षात विशेषतः आणीबाणी नंतरच्या काळामध्ये पुण्याचा कामगार बराच जागृत झाला आहे. या जागृत पट्ट्यामध्ये–पिंपरी, चिंचवड भागामध्ये–१४ सप्टेंबरला निदर्शने होऊ नयेत म्हणून १४४ कलम लावण्यात आले. इथे कामगारांची १४४ कलमाने मुस्कटदाबी करण्यात आली. ठाण्यालाही कामगारांच्या मोर्चाला हल्ल्याला तोंड द्यावे लागले.

महागाई, चलनवाढ, लोकशाही हक्काचे संकोचन मोर्चावर लाठीहल्ले, अश्रुधूर ही परिस्थिती ७४ पेक्षा काही वेगळी नाही. ७४ सालामध्ये लोकशाही हक्क हळूहळू काढून घेतले गेले आणि मग आणीबाणी आली. आज तशीच परिस्थिती आहे. पुण्याच्या कामगार विभागात सतत कलम १४४ च साम्राज्य असतं. ग्रामीण भागातील जनसंघटनांच्या कार्यकर्त्यांवर सतत खोट्या केसेस भरल्या जात असतात. संघटितांना खच्ची करण्यासाठी असंघटितांवर प्रेम करणारी मंडळी अशा वेळेस मात्र गप्प

बसतात. शेतमजुरांवरच्या लाठीहल्ल्याच्या वेळी त्यांचे मौन चालू असते.

शहाद्याचा अश्रुधूर आणि पुण्याचे १४४ कलम यातून बरेच प्रश्न निर्माण झाले आहेत. सर्वसामान्य माणसाला जे प्रश्न भेडसावत आहेत. त्याविरोधी त्याने आवाज उठवला तर त्याला लाठ्या व अश्रूधुरानीच उत्तर मिळणार आहे का? ही वाढती दडपशाही कशाचे लक्षण आहे? पोलीस स्वत:च्या अधिकाराचा प्रमाणाबाहेर दुरुपयोग करतात याबद्दल शासन मूग गिळून गप्प रहाते, याचा अर्थ पोलिसांना शासनाचे फार मोठे संरक्षण आहे असाच होत नाही का? आणि जर तसे असेल तर आणीबाणीतले अत्याचार आणि आताचे, यात काही फरक आहे का? म्हणूनच शहाद्याचा अश्रुधूर आणि पुण्याचे १४४ कलम याकडे फक्त शहाद्यातील किंवा पुण्यातील घटना असेच पाहिले जाणार असेल आणि तसे बघून त्याकडे दुर्लक्ष करून गप्प बसणार असू, तर आपण दोन्ही हातांनी दुसऱ्या आणीबाणीचे स्वागत करत आहोत. याचेही भान ठेवावे लागेल.

—लता भिसे

## कितो मोठ्या संधी आपण हुकवत आहोत हे राजकारण्यांना कळतच नाही...

# भारत : एक वेगळेच चित्र

**डॉ. शरद अभ्यंकर, वाई**

आपला देश मागासलेला आहे, दरिद्री आहे, असामान्य बुद्धीच्या लोकांना इथे वावच नाही इ. कल्पना आपल्या डोक्यात इतक्या पक्क्या रुजलेल्या असतात, की या व्यतिरिक्त काही ऐकले वा वाचले की आश्चर्य वाटते.

'टाईम' साप्ताहिकाचे आशियाई विभागाचे अर्थविषयक प्रतिनिधी रॉस मन्रो यांनी नुकताच भारताचा दोन आठवड्याचा दौरा केला. त्यांच्या पाहणीचे निष्कर्ष कोणाही भारतीयाला अभिमान वाटेल असे आहेत. ते लिहितात—

पुण्यामधील किर्लोस्कर ऑईल इंजिनच्या कारखान्यातून अत्याधुनिक डिझेल इंजिने तयार होऊन ओळीने बाहेर पडतात आणि बाल्टिमोर, हाम्बुर्ग, लिव्हरपूल, सिडने अशी नावे लिहिलेल्या खोक्यात पॅक केली जातात. पुणे आणि जमशेटपूर इथल्या टेल्कोच्या कारखान्यात, विकसनशील देशातील खडबडीत रस्त्यांचेकरता दणकट ट्रक्स बनवले जातात आणि कुवेत, नायजेरिया, युगांडा, झांबिया या देशात रवाना होतात. 'अप्लाईड इलेक्ट्रॉनिक्स'च्या मुंबई येथील गुंतागुंतीच्या प्रयोगशाळातून तरुण तंत्रज्ञ पश्चिम जर्मनी, ब्रिटन, कॅनडा आणि सिंगापूर इथल्या कंपन्यांचेकरता विद्युत् यंत्रे आणि ऑसिलोस्कोप बनवीत असतात. मुंबईच्या टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसच्या कार्यक्षम कचेऱ्यातून, ऑस्ट्रेलियामधील सिटीकॉर्प बँकेच्या व्यवहारांसाठी नवी कॉम्प्यूटर यंत्रणा रचण्याचे काम तिथले तज्ज्ञ करत असतात.

हा निश्चितच ठराविक ठशाचा भारत नव्हे! सर्वसाधारण पाश्चिमात्य माणसाच्या मनात भारताविषयी काही प्रतिमा ठाम रुजलेल्या असतात. गंगेत स्नान करणारे धोतरवाले, कृश साधू, येणाऱ्या जाणाऱ्यापुढे आपले व्यंग दाखवून भीक मागणारे भिकारी, पोती-तरटांच्या झोपड्या इ. इ. हा भारत अद्यापही अस्तित्वात आहे आणि ही प्रतिमा इतकी खोलवर रुजलेली आहे की, भूतपूर्व अमेरिकन वकील पॅट्रिक मोयनिहान तर एकदा तुच्छतेने उद्गारले होते, 'साथीच्या रोगाव्यतिरिक्त भारत निर्यात तरी दुसरे काय करतो?'

वस्तुस्थिती अशी आहे की, औद्योगिक प्रगतीत सर्व राष्ट्रांमध्ये भारताचा दहावा क्रमांक लागतो. गेल्या वर्षी या देशाची एकूण निर्यात होती ६९ कोटी डॉलर्सची, त्यापैकी ८·७५ कोटी डॉलर्स होते यांत्रिकी मालाच्या निर्यातीचे. या यांत्रिकी मालात छोट्या लेथ आणि स्कूटर्सपासून संपूर्ण कापड गिरणीपर्यंत विविध वस्तूंचा समावेश होता. १९७९–८० सालचे लक्ष आहे, १० कोटी डॉलर्सच्या अशा मालाच्या निर्यातीचे!

औद्योगिक स्पर्धेत यशस्वी होण्याकरता भारताची तयारी फारच चांगली आहे. कच्चा माल इथे मुबलक उपलब्ध आहे. कोळशाचे साठे ८१० कोटी टन, जगातील खनिज लोखंडापैकी एक चतुर्थांश, मॅंगॅनीजपैकी १/३, या व्यतिरिक्त अन्य अनेक खनिजे आणि अद्याप पूर्णपणे उपयोगात न आणलेला जलविद्युत्शक्तीचा अमाप सुप्त साठा. आशिया खंडातली सर्वात मोठी रेल्वे. (जगात क्रमांक चौथा) आणि झपाट्याने वाढणारे विद्युत् शक्तीचे जाळे. (या वर्षीची वीजनिर्मिती २९००० मेगॅवॅट), जहाज बांधणीचे आणि विमान बांधणीचे कारखाने आणि प्रगतिपथावरील आधुनिक दळणवळण यंत्रणा.

हे झाले वस्तुरूप भांडवल. याशिवाय मानवी भांडवल इथे दोन प्रकारात मुबलकपणे उपलब्ध आहे. अल्पदरात मिळणारे मानवी श्रम आणि तंत्रज्ञ आणि अभियंत्याची फौज. भारतातल्या १११ तांत्रिकी संस्था आणि विद्यापीठातून हे विशेषज्ञ तयार होतात. अमेरिका आणि रशिया यांचे खालोखाल भारताचा या क्षेत्रात क्रमांक लागतो. या भारतीय तंत्रज्ञांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे आधुनिक जगातील प्रगत गोष्टींच्या रचनेमध्ये आपल्या अप्रगत देशातील गरजानुसार बदल घडवून त्या वापरणे– B. H. E. L. चे संचालक श्री. शरण सांगतात, 'कधीही आम्ही एखादी परकी यंत्रसामुग्री उपयोगात आणतो, तेव्हा आमच्या तंत्रज्ञांना आम्ही ती सर्व सुटी करायला

लावतो, ही अशीच का बनवली याचं पृथःकरण करायला सांगतो, आमच्या विशिष्ट गरजांचे करता ही उपयोगी पडेल का याचा निर्णय घेतो आणि नसेल तर नवी रचना कशी करता येईल याचा शोध घेतो. नुसते 'कसे' नव्हे तर 'असे का' हे समजण्याची इच्छा असते आमची.'

या पद्धतीच्या कौशल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जोरदार स्पर्धा करणे भारताला शक्य होते. उदाहरणार्थ B. H. E. L चे १६०० कर्मचारी (यात अभियंत्यापासून मजूरापर्यंत सर्व थरातले लोक आहेत.) सध्या लिबियामध्ये १० कोटी डॉलर्स किंमतीचे विद्युत् निर्मिती केन्द्र पूर्ण करीत आहेत. B. H. E. L. नेच, न्यूझीलंडला १० जलविद्युत् यंत्रे पुरवण्याचे कंत्राट जागतिक स्पर्धेला तोंड देऊन जिंकले आहे. भारतातील खासगी मालकांच्या बिर्ला उद्योग समूहाने नायजेरियामध्ये एक कागदाची गिरणी, इंडोनिशियात सूत गिरणी, थायलंडमध्ये कापड धाग्याचा कारखाना, मलेशियात पामतेलाच्या निर्मितीचा कारखाना इ. उभारले आहेत आणि आता लवकरच कॅनडामध्ये अमेरिकेच्या हद्दीला लागूनच एक उच्च तांत्रिकतेने युक्त मोटारींच्या सुट्या भागांचा कारखाना हा समूह उभारणार आहे.

मोठमोठ्या औद्योगिक राष्ट्रांशी स्पर्धेत टक्कर देऊन मिळवलेले हे विजय साहजिकच भारतीयांच्यामध्ये अभिमान फुलवतात. 'मलेशियात आम्ही जपान्यांना हरवले, न्यूझीलंडमध्ये जर्मनांना तर लिबियामध्ये फ्रेंचांना!' परदेश मंत्रालयातील एक अधिकारी रोमेश भंडारी उत्साहाने सांगतात. 'आणि वैशिष्टच म्हणजे' ते पुढे म्हणतात 'इतर स्पर्धक दीर्घ मुदतीच्या आणि कमी व्याजाच्या कर्जाचे आमिष दाखवतात. तसे आम्ही करू शकत नाही.'

विकसनशील राष्ट्रांशी व्यापार करताना भारताला एक मोठा फायदा आहे तो म्हणजे इथले उद्योजक अजूनही लहान प्रमाणावरील गोष्टींचा विचार करू शकतात. बिर्ला समूहातील एक अधिकारी श्री. जव्हेरी यांचे स्पष्टीकरण करतात. 'समजा कोणा विकसनशील राष्ट्राला कापड उद्योग सुरू करायचा आहे, तर आम्ही त्यांना योग्य असे तंत्र सुचवू शकतो. अमेरिकन वा जपानी लोक चारशे चात्यांवर एकाच प्रकारचे कापड काढणारी गिरणी सुचवतील. तर आम्ही १२० चात्यांवर १० प्रकारचे कापड करण्याची योजना मांडू. जपानी व अमेरिकन तंत्रज्ञांच्या हे डोक्यातच येणार नाही.'

भारतातले औद्योगिक रचनाकार, चीनमधील अशा मंडळींच्या तुलनेने अनेक योजने आघाडीवर आहेत. 'चीन अद्याप कृत्रिम धाग्याची गिरणी पूर्णतः उभारू शकत नाही.' सुप्रसिद्ध टाटा समूहाचे अर्थतज्ज्ञ मेहता सांगतात, 'भारताने दक्षिण कोरियात अशी एक आणि थायलॅंडमध्ये अशा तीन गिरण्या उभारल्या आहेत. मुंबईजवळ पवई येथे भारतीय मालकीचा लार्सन अँड टुब्रो हा महाकाय कारखाना, भारतीय अणुभट्टयांचेसाठी एंडप्लेट्स बनवीत असतो आणि इथेच, ज्या प्रकारच्या खत कारखान्याच्या उभारणीसाठी चीन अद्याप परदेशांवर अवलंबून आहे, अशा खत कारखान्यांचे गुंतागुंतीचे अवयव तयार केले जातात. या दोन देशातील मोठा फरक राजकीय आहे. चीनमधले शास्त्रज्ञ सांस्कृतिक क्रांतीचे वेळी राजकीय शिक्षणाकरता मजुरी काम करत होते, त्याचवेळी भारतीय शास्त्रज्ञ अत्याधुनिक तंत्रांचा पाठपुरावा करण्यात गुंतले होते.

भारताच्या अर्थव्यवस्थेतही राजकारणाचा हस्तक्षेप जबरदस्त असतो. अनेक भारतीय कंपन्या परदेशी कंत्राटे मिळवण्याच्या प्रयत्नात असतात. याचे एक कारण म्हणजे देशात असणारा लाल फितीचा धुमाकूळ. एखाद्या कारखान्याने अस्तित्वात असणाऱ्या यंत्रसामुग्रीच्या सहाय्यानेच जादा कार्यक्षमता दाखवून परवान्यातील मर्यादेपेक्षा जास्त उत्पादन केले, तर त्याच्या मालकाला दंड होऊ शकतो. 'ज्या देशात उत्पादनवाढीबद्दल शिक्षा होऊ शकते. असा भारत एकमेव देश आहे,' अशी तक्रार बिर्ला समूहाचे अशोक बिर्ला करतात. 'या दशकाच्या सुरुवातीपासून आम्ही परदेशात विस्तार करण्याचा सच्चा प्रयत्न सुरू केला, कारण इथले व्यवसायावरचे सरकारी निर्बंध. जुलूम शब्द वापरणे मला आवडत नाही; पण आम्हाला जुलुमामुळे परदेशी धंदा वाढवावा लागला.'

काही अंशी, देशाबाहेरील बाजारपेठा शोधण्याचे अत्यंत महत्त्वाचे कारण म्हणजे भारतीय जीवनाचे एक विदारक सत्य आहे. भारताच्या ६५ कोटी लोकसंख्येपैकी ८० टक्के लोक छोट्या खेड्यातील शेतावर रहात असतात आणि त्यांचे राहाणीमान काही वेळा केवळ कसेबसे जगण्याइतके निकृष्ट दर्जाचे असते. भरपूर धान्य साठ्यामुळे आता दुष्काळाची भीती पूर्वीसारखी राहिलेली नाही आणि परदेशी गंगाजळी ६५० कोटी डॉलर्सची असल्यामुळे लागोपाठ ३ पावसाळे कोरडे गेले तरी चालण्यासारखी परिस्थिती आहे. खरे तर १९७० पासून पुढे लोकसंख्यावाढीपेक्षा जास्त प्रमाणात धान्योत्पादन वाढ झाली आहे. इतके असूनही ग्रामीण भारतात पैशाचे दुर्भिक्ष्य इतके प्रचंड असते की, ही सुप्त शक्तीची प्रचंड बाजारपेठ भारतीय उद्योजकांना असून नसल्यासारखीच आहे.

मोरारजी देसाई यांचे जनता सरकार ग्रामीण जनतेचे भवितव्य सुधारण्यासाठी वचनबद्ध होते. नुकत्याच उद्घाटन झालेल्या पंचवार्षिक योजनेत शेतीला पाणीपुरवठा, पूरनियंत्रण आणि जलकेंद्रे यांच्यावर दुप्पट खर्च करण्याचे ठरवले आहे. या उपायांनी जादा जमीन पाण्याखाली येऊन उत्पादन मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

राजकृष्णा हे भारतीय अर्थतज्ज्ञ सांगतात, 'या शतकाच्या अखेरीस धान्योत्पादन ३०० ते ४०० टक्क्यांनी वाढू शकेल.' टाटाचे एफ्. ए. मेहता म्हणतात, 'पुढल्या दहा वर्षांत शेतीमालाची मोठ्या प्रमाणावर निर्यात करणारा एक देश या स्वरूपात भारत ओळखला जाईल.'

अशी वेळ येईपर्यंत, ग्रामीण भागातील पूर्ण वा अर्ध बेरोजगारीशी सामना करणारी सरकारी धोरणे, बड्या उद्योगांच्या देशांतर्गत विस्ताराच्या आड येणारच. 'दर वर्षी ६० लाख लोक आमच्या देशात काम शोधणाऱ्यांच्या फौजेत दाखल होतात,' राज कृष्णा म्हणतात, 'आधुनिक औद्योगिक विभाग फार तर ५ लाख लोकांना काम पुरवू शकेल. बाकींच्या ५५ लाखांचे आम्ही करायचे तरी काय?' भूमिहीन मजुरांच्या वाढत्या संख्येला काम पुरवण्यासाठी केंद्रसरकार श्रमप्राधान्ययुक्त कुटिरोद्योगांना जोरदार उत्तेजन देत आहे आणि भांडवलप्रधान मोठ्या उद्योगांवर जबर नियंत्रणे लादत आहे. १ कोटी भारतीय घरात, छोट्या कारखान्यात वा

खेड्यात, हातमागावर सुती कापड विणतात. यंत्रप्रधान कापडधंद्याला अमर्याद वाढू दिले तर यातले अनेकजण बेकार होतील. शेतावर देखील यंत्रे मर्यादितच वापरावी लागतात. नुकतेच पंजाबमधल्या श्रीमंत शेतकऱ्यांनी मागवलेली १००० 'एकत्रित कापणी यंत्रे' सरकारला रोखून धरावी लागली–१॥ लाख फिरत्या मजुरांचे काम बुडू नये म्हणून !!

अनेक सरकारी योजना खाजगी उद्योगांच्या टीकेचे विषय बनतात. उदाहरणार्थ, साबण आणि काड्यापेट्या लघुउद्योगात बनवण्याचा निर्णय. असे उघुउद्योग सर्व देशभर एका रात्रीत उभारले जातील याची टीकाकारांना शंका वाटते आणि समजा, राहिलेच तर त्यांना कच्च्या मालाचा खात्रीलायक पुरवठा आणि वितरणाची व्यवस्था कुणी करायची ?

ग्रामीण भागात शहराची ओढ जास्त आहे. काही महिन्यांपूर्वी मिरजेत भांडी तयार करणारा तांबट अमीर शेख कसेबसे दरमहा २–२॥ शे रुपये मिळवत असे. आज तो पुण्याजवळच्या एका कारखान्यात, एका कातरकामाच्या सुधारित यंत्रावर ॲल्युमिनियमचे कीटकनाशकाचे डबे तयार करून १॥–२ हजार रुपये मिळवतो. आता सगळेच अर्धकुशल कामगार इतके पैसे मिळवू शकत नाहीत. पण त्यांच्या खेड्यापेक्षा निश्चितच जास्त कमाई ते शहरात करू शकतात.

राजकृष्णा यांच्या स्वप्नातील भारतात जास्त उत्पादन देऊ शकणाऱ्या नव्या शेतीपद्धतीने गरीब भूमिहीन शेतमजुरांना कामही मिळेल आणि भांडवलप्रधान मोठ्या उद्योगांनाही वाव मिळेल. 'कालवे काढायचे तर सिमेंट हवेच.' ते सांगतात, 'शेतीला पंप हवेत. ३० लाख पंप हवेत, तर डिझेल इंजिने हवीत आणि पोलाद हवे, खते हवीत म्हणजे पेट्रोकेमिकल्सचे कारखाने हवेतच. खेड्यापाड्यात वीज पोचवायची म्हणजे अलोह धातूंशिवाय कसे चालणार?' लांबवर पाहिले तर राजकृष्णा यांच्या मते भारताच्या अर्थविकासाचे भवितव्य चांगलेच उज्ज्वल आहे. 'आम्ही लोकसंख्यावाढ कमी करतो आहो, आमचे तंत्रज्ञान सुधारत आहे आणि वाढीची क्षमता तर अफाट आहे.' नजिकचा भविष्यकाळ मात्र त्यांच्या मते आणि उद्योग तज्ज्ञांच्या मते, भारतीय राजकारणी वस्तुस्थितीमुळे ढगाळलेला आहे. सरकारी अधिकारी हा एक नवाच खास हक्क असणारा वर्ग तयार झाला आहे. अनंत नियम, अटींनी सुसज्ज अशी ही मंडळी आपली ताकद दाखवण्याच्या नादात आर्थिक प्रगतीऐवजी परागती घडवण्यास मदत करतात. आमचे राजकारणी ज्ञानरोधक (Knowledge–proof) आहेत.' राजकृष्ण तीव्र प्रतिक्रिया व्यक्त करतात. टेल्कोचे मुळगावकर सांगतात, 'देशाच्या सुप्त शक्तीच्या आणि प्रश्नांचा प्रत्यक्ष अभ्यास करण्यात आपला वेळ सत्कारणी लावण्याऐवजी ही मंडळी राजकीय उखाळ्या–पाखाळ्या काढण्यात तो वाया घालवतात. 'आमच्या मंत्र्यांना कधी कुठल्या कारखान्याला भेट देण्यासाठी वेळ नसतो.' ते सांगतात, 'आर्थिक वस्तुस्थितीची त्यांना जाणीवच नसते. किती मोठ्या संधी आपण हुकवत आहोत याचीही त्यांना कल्पना नसते.'

भारताचे आर्थिक समृद्धीचे स्वप्न प्रत्यक्षात आणायचे झाले तर नव्या दिल्लीतल्या अधिकारी वर्गाने जरा दाद देणे आवश्यक आहे ! □

## दुहेरी तर्कनिष्ठा की प्रच्छन्न पलायनवाद

पृष्ठ ८ वरून

वेळी लाघवीकरण करून चालणार नाही. राष्ट्र, समाज हा मोठा खराच पण त्यासाठी मनस्वी त्याग करणारी व्यक्ती राष्ट्राहून मोठी नाही तरी राष्ट्राइतकी मोठी मानणे हेच निकोपणाचे होईल. संघापासून वाजपेयींनी आजन्म प्रेरणा घेतलेली आहेच, पण संघानेही वाजपेयींपासून काही घेण्यात संघ अधिक थोर होऊ शकेल. लेलेसाहेबांच्या लेखामुळे संघ म्हणजे परतीची पावले न दाखविणारी इसापाची गुहा असावी ही शंका बळावली, तर वाचकास दोष देता येणार नाही. लेलेसाहेबांचा प्रतिटीकालेख वाचल्यावर प्रामाणिकपण असे वाटले, की त्यांचे विवेचन हाच संघाचा पूर्ण अधिकृत विचार असेल तर टिकणे एवढीच संघाची आकांक्षा आहे, वाढणे ही नव्हे; एवढाच निष्कर्ष संघाबद्दल भविष्यकाळात काढता येईल.

पण खरे म्हणजे खुद्द संघाच्या भवितव्याविषयी सामान्य नागरिकाला उठाठेव करण्याचे कारणच नाही. सामान्य नागरिकाला रस आहे तो जनता पक्षाच्या रूपाने उदयास आलेला समर्थ लोकशाहीवादी राजकीय पर्याय (ज्यात संघ–जनसंघाचा सिंहाचा वाटा होत आहे) उभा रहाणार आहे, की अल्पसा ठरणार आहे या प्रश्नात. एक मोठी राजकीय संधी जनतापक्षीयांनी गमावली अशी हळहळ व्यक्त करताना वाजपेयींना या पर्याया विषयीच खरी चिंता वाटत आहे, हे उघड आहे. संघाचे लोकमानसात स्थान काहीही असो, संघ लोकानुनयांच्या अधीन असो वा नसो, जनता पक्ष लोकमानसात आपलेपणाचे भक्कम स्थान निर्माण केल्यावाचून जगू शकत नाही आणि रास्त लोकानुनयावाचून वाढू शकत नाही, हेच जनता पक्षाच्या सत्ता पतनाचे रहस्य दिसते. वाजपेयींनी ते ओळखलेले आहे. पण राजकारणाच्या खळीत त्यांना पुरेशी स्वायत्तता नाही हेच खरे दुखणे आहे. श्रीयुत शशिकांत जोशी (तारापूर) यांनी भूतपूर्व जनसंघाकडून व त्यांच्या नेत्यांकडून संघावरील गैरसमज दूर करणारी व्यवस्था इतकीच अपेक्षा केली दिसते. दुसऱ्या स्वातंत्र्यात जनसंघीयांचे योगदानच न मानण्याइतके ते प्रामाणिक व निर्भय आहेत. पण लेलेसाहेब आणि श्री. जोशी यांचे विचार वरवर पहाता परस्परछेदक वाटले तरी शेवटी त्यातून खंद होतो तो वाजपेयींच्या कालसापेक्ष व अनिवार्य अशा प्रतिमेचाच ! वाजपेयींच्या राजकीय विचाराचा बळी गेलेला आहेच. आता वाजपेयी व्यक्ती अथवा पदाधिकारी म्हणून संघटनेत व राजकीय पक्षात राहिले तरी त्याला बावनकशी मोल उरलेले नाही. तत्त्वाला मुरड घालण्याची पाळी तत्त्वपूजकांच्या बाबतीत यावी यापेक्षा अधिक दारुण शोकांतिका असू शकत नाही. हजारो, लाखोंची संघटना चालविणारे (!) ही शोकांतिका कोट्यावधी लोकांपर्यंत संक्रमित करणार आहेत काय, ही समस्या आता दूरची नाही.

लेलेसाहेब सुखी आहेत. ते ही सर्व विचारसरणी उथळ आहे असे म्हणून सहज बाजूला सारू शकतात. संघाची पृथ्वीकेंद्री विचारधारा प्रभावी ठरते की वाजपेयींनी सूचित केलेली लोकमानसरूपी सूर्यकेंद्री विचारधारा आपली शक्ती अधिक प्रकट करते ते लोकमताचा आकारच ठरविणार आहे. वाजपेयींचे आजचे 'अरण्यरुदन' तेव्हा सर्वस्पर्शी आकाशवाणी ठरेल असाच संभव आहे. □

प्रतिभा रानडे

काबूल

# ' तेव्हा आम्ही सर्व बुद्धधर्मीय होतो....' गफारखानांचे हे उद्‌गार ऐकून मी थक्कच झाले...

## बादशहाखानांची भेट !

तीन वर्षांपूर्वी अफगाणिस्थानला यायचं ठरलं तेव्हाच मनाने ठरवून टाकलं होतं, की संधी मिळाली की बादशहाखान यांना भेटायचं. हातात बंदुका घेऊनच जन्माला येणाऱ्या पठाणांना त्यांनी अहिंसेची दीक्षा दिली होती. मुस्लिम लीगच्या राजकारणाला स्वतःपासून चार हात दूर ठेवणाऱ्या याच गफारखानांच्या 'लाल शर्टवाल्यांच्या' जीवावरच कॉंग्रेस स्वतःचं निधर्मी राजकारण करत होती. 'माझ्या देहाचे तुकडे होतील, मगच देशाची फाळणी होईल' असं म्हणणाऱ्या गांधींसकट सगळेजण, वेळ आली तेव्हा बादशहाखान यांना विसरून गेले– परस्परच ब्रिटिशांशी समझौता करून मोकळे झाले. या आणि अशा कित्येक गोष्टींमुळे बादशहाखान यांच्या नावाभोवती अद्‌भुततेचं वलय आलेलं आहे. म्हणूनच त्यांना पहाण्याची विलक्षण उत्सुकता होती; पण इथे आल्यावर लक्षात आलं की, त्यांना भेटणं फारच कठीण.

पाकिस्तानी नागरिक असूनही पाकिस्तानशी शत्रुत्व असल्यामुळे बादशहाखान अफगाणिस्थानातच राहतात. त्यांच्या राहण्याच्या ठिकाणाबद्दल फारच गुप्तता पाळली जाते. ते कधी काबूलला असतात तर कधी जलालाबादला असतात. काबूलला कधी येतात, कुठे रहातात याबद्दल एवढी गुप्तता का पाळतात कुणास ठाऊक ? कारण अफगाणिस्थानात बादशहाखान यांना खूप मान आहे, साधारणपणे त्यांना इथे 'बाबा'च म्हटलं जातं, एवढा मान त्यांना आहे.

शिवाय मुकुंदा केंद्रसरकारचा अधिकारी. आम्ही त्यांना भेटायला गेलो तर त्याचा काय अर्थ लावला जाईल कुणास ठाऊक, तेव्हा बादशहाखान यांना भेटण्याचा एवढा आग्रह कशाला ? अशी एक अधिकारावर असलेल्यांची वृत्ती आणि सल्ला ! त्यामुळे बादशहाखान यांना भेटणं होतच नव्हतं.

गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये पुण्याचे श्री. हरीभाऊ जोशी आणि मुंबई सकाळचे श्री. माधव गडकरी बादशहाखान यांना भेटायला काबूल इथे आले होते. आपली मराठीच माणसं आहेत, हॉटेलमध्ये कशाला रहायचं त्यांनी, असा विचार करून मी त्यांना आमच्या घरीच रहायला बोलावलं. ते आले त्याच्या दुसऱ्या दिवशी इथे 'पख्तूनिस्तान डे' साजरा झाला. पख्तूनिस्तान चौकामध्ये भाषणं वगैरे झाली. शंभर–दीडशे पठाण त्या दिवसासाठी मुद्दामहून काबूलला आले होते. 'पख्तुनिस्तान झालेच पाहिजे', 'पठाणांना न्याय मिळालाच पाहिजे' म्हणून तावातावाने भाषणं झाली होती. एक आवश्यक उपचार एवढंच त्या समारंभाला महत्त्व होतं. भुट्टो फाशी गेले त्या अगोदर इथे आले होते. तेव्हा एअरोड्रोमवरून अर्गपॅलेसवर जाताना, त्यांनी या राजमार्गावरून जाण्याचं नाकारलं होतं, त्यांची गाडी वळसे घेऊन दुसऱ्याच रस्त्याने गेली होती, त्याचे कारण, या चौकाला पख्तूनिस्तानचे नाव आहे हे होते आणि दरवर्षी 'पख्तूनिस्तान डे' साजरा करणाऱ्या अफगाण सरकारने त्यावेळी भुट्टोच्या म्हणण्याला मान तुकविली होती ! जाहीरशहा काय, दाऊदखान काय किंवा तराकीचे नवीन क्रांतिकारी सरकार काय, पख्तूनिस्तानच्या बाबतीत सगळ्यांचे धोरण एकच आहे.

बरीच खटपट केल्यावर बादशहाखान याचा ठावठिकाणा मिळाला आणि जोशी आणि गडकरी यांचे जलालाबादला जाण्याचे ठरले. त्यांच्याबरोबर जाण्याची माझी फार इच्छा होती. कारण अशी संधी पुन्हा मिळणार नाही याची खात्रीच होती मला; पण अम्बॅसॅडर साहेबांची परवानगी घेतली नव्हती. न विचारता जाणं योग्य झालं नसतं. कारण एखादी गोष्ट आपण सहजपणानं करून जातो; पण त्यातून कोठा कसा अर्थ काढेल काही सांगता येत नाही. विशेषत: परदेशात असताना. श्री. जोशी यांचीही इच्छा नव्हतीच. त्यांचं म्हणणंही बरोबरच होतं की, ते स्वत: बरेच वर्षांनी गफारखान यांना भेटत होते. ती भेट कशी काय होते कुणास ठाऊक ? शिवाय इथली नवीन राजवट, आपल्या सरकारचे गफारखान यांच्याबाबतचे धोरण अनिश्चित. (त्यावेळी औषधोपचारासाठी गफारखान यांनी दिल्लीला जावे की मॉस्कोला याबाबत सरकारीस्तरावर चर्चा सुरू होती.) आमच्यासारख्या सरकारी नोकरांनी अशा वेळी गफारखानांना भेटणं... वगैरे वगैरे खूप चर्चा झाली, चर्चा करता करता वेळ टळून चालली

म्हणून शेवटी गडकरी, जोशी दोघंच जलालाबादला निघून गेले. माझ्या जीवाला मात्र विलक्षण रुखरुख लागून राहिली.

जोशी, गडकरी जलालाबादला जाऊन दोन दिवस झाले होते. त्या दिवशी घरचं सगळं काम टाकून काही तरी लिहित बसले होते. सकाळचे १०–१०॥ वाजले होते आणि एकदम गडकरी धावतच घराच्या फाटकातून आत शिरले. जोशी, गडकरींच्या बरोबरच गफारखान काबूलला आले होते. त्या दोघांना आमच्या घरी सोडून मग ते स्वतःच्या निवासस्थानी जाणार होते. म्हणजे त्यावेळी बादशहाखान माझ्या घरासमोरच गाडीमध्ये होते आणि तेच सांगायला गडकरी घाईघाईनें घरात आले होते. मीही मग धावतच रस्त्यावर गेले. बादशहाखान यांना नमस्कार केला. त्यांना उर्दू–हिंदी चांगलंच येतं. त्यांना म्हटलं, 'आपण तीन साडेतीन तासांच्या प्रवासानं दमला असाल; पण पाच मिनिटं माझ्या घरी आलात तर मला फारच बरं वाटेल. येणार का?' मनात आलं होतं की– गफारखानासारख्यांना मी माझ्या घरी या म्हणून इतक्या सहजपणानं आमंत्रण देऊ शकते का? बरं दिसेल का ते? जरा आगाऊपणाच नव्हे का हा?

पण तेवढ्यात हरीभाऊ जोशी गफारखानांना म्हणाले, 'या मुलीनं माझ्या स्वतःच्या मुलीसारखी माझी व्यवस्था ठेवली आहे. तिला तुम्हाला पहायची अतिशय तळमळ होती. जलालाबादलाच येणार होती ती; पण तुम्हाला न सांगता येणं बरं दिसलं नसतं म्हणून ती आली नाही; पण आता तुम्ही सहजच तिच्या घरासमोर आला आहात. पाच मिनिटं घरात आलात तर तिला फार बरं वाटेल' आणि हरीभाऊंच्या सांगण्याला मान देऊन बादशहाखान एवढा मोठा माणूस अगदी सहजपणानं माझ्या घरी आला! एखाद्यानं आपल्या नातेवाईकाकडे जेवढ्या सहजपणानं जावं तेवढ्या सहजपणानं! उगाचच आढेवेढे नाहीत, मोठेपणाचा दंभ नाही, किंवा दुसऱ्यावर आपण काही विशेष कृपा वगैरे करतो आहोत, अशीही भावना नाही.

खादीचा पांढराशुभ्र, धुवट शर्ट पायजमा, गोल उंच टोपी, सव्वासहा फूट ताठ उंची, उगाचच खांदे पाडून चालायची लकब नाही, गोरापान रंग, एखाद्या अतिशय सुरेख माणसाचं कुणी सिद्धहस्त कार्टूनिस्टनं चित्र काढावं तसा चेहरा. म्हणजे भलं मोठं नाक, जाडजाड. विस्कटलेल्या भुवयांखालचे मायाळू डोळे. ब्रिटिशांच्या डोक्याला तापदायक झालेले, बॅ. जिनांनी ज्यांना शत्रू मानलं होतं ते, एकेकाळी हिंदुस्थानचं राजकारण गाजवलेले, अत्यंत प्रामाणिक असे हे ९० वर्षांचे बादशहाखान माझ्या घरी आल्यावर मला म्हणाले, 'घर छान आहे हं तुमचं!' जगातल्या कुठल्याही गृहिणीला जिंकून घेणारं वाक्य!

मी त्यांना म्हटलं, 'आपल्यासारखा एवढा मोठा माणूस माझ्या घरी आला, हे केवढं भाग्य माझं. जन्मभर आठवणीत राहील ही आपली भेट.'

'मी कुणी मोठा माणूस वगैरे नाही. मी खुदाई–खिदमतगार (म्हणजे परमेश्वराचा सेवक) आहे. पख्तुनिस्तान आम्हाला स्वतंत्र हवं आहे. ते परमेश्वराचं काम आहे असं समजून मी ते काम करतो आहे. तुमच्यासारख्या लोकांनी मदत केली तर हे काम होईल. नाही तर होणार नाही. (मी लिहिते वगैरे असं जोशींनी त्यांना सांगितलं होतं म्हणून ते तसं म्हणाले.) राजकारण करणारे सगळेजण आता आपापल्यातच एवढे गुंतून गेले आहेत की, पख्तुनिसासारख्या प्रश्नाकडे लक्ष द्यायलाही कुणाला वेळ नाही. इच्छाही नाही; पण हे काम झालंच पाहिजे एवढीच माझी इच्छा आहे. माझ्या आयुष्याचं ध्येय तेच आहे.'

फळ, चहा वगैरे त्यांनी काही घेतलं नाही. त्यांच्या बरोबरच्या अफगाण लोकांनी सांगितलं, 'बाबा दुसरीकडे कधीच काही खात नाहीत. स्वतःचा स्वैपाक, सगळं कामही ते स्वतःच्याच हाताने करतात.'

संध्याकाळी पुन्हा कुठे भेटायचं वगैरे ठरल्यावर गफारखान परत जायला निघाले. यावेळी अफगाण पद्धतीप्रमाणे मी त्यांच्याशी हस्तांदोलन केलं. मी वाघाशी काही कधी हस्तांदोलन केलं नाही, तरी पण बादशहाखान यांच्याशी हस्तांदोलन करताना वाटलं, वाघाचा हात असाच असावा. वाघासारखे मजबूत, रुंद हात असूनही त्यांचे तळवे अतिशय मऊशार, गुलाबी आहेत आणि मघाशी तर तो माणूस सांगत होता की, स्वतःचा स्वैपाक, धुणंभांडी ते स्वतःच करतात म्हणून!

बादशहाखान घरी आले तेव्हा मुलं शाळेत गेली होती, मुकुंदा ऑफिसला गेलेला होता. घरी आल्यावर त्यांना सांगितल्यावर ते म्हणाले, 'तू अगदी नशीबवान आहेस. आम्हाला काही त्यांना पहाता आलं नाही. त्यांच्याशी बोलता आलं नाही.' हरीभाऊ जोशी तर गंमतीनं म्हणाले, त्यांना भेटायला म्हणून आम्ही शेकडो मैलांवरून इथं आलो आणि ते मात्र तुम्हाला भेटायला तुमच्या घरी आले, नशीबवान आहात. त्यांना भेटण्याची तुमची खरोखरच मनापासून फार इच्छा होती असं दिसतंय.'

गफारखान यांच्याबद्दल विचार करायला लागलं की, मन उदास होतं. एखादा कर्तृत्ववान पुरुष म्हातारा झाला की, त्याच्याच तरुण कर्त्या मुलांना जशी त्याची अडचण वाटू लागते, तसं काहीसं गफारखानांच्या बाबतीत झालं आहे. पख्तूनिस्तानचा प्रश्न म्हटला तर आहे म्हटला तर नाही. कारण पाकिस्तानच्या संबंधात जेव्हा अफगाणिस्थानला जरूर वाटते तेव्हा ते पख्तूनिस्तानच्या प्रश्नाचं तुणतुणं वाजवतात. एरवी तो प्रश्न सोडवायचा मनापासून प्रयत्न कोणीही करीत नाही, केलाही जाणार नाही. पख्तूनिस्तानसारखे बारीकसारीक प्रश्न कुठे कुठे असणं हे रशिया, अमेरिकेसारख्या बड्या राष्ट्रांनाही सोयीचे असते. अशी भिजत पडलेली घोंगडी केव्हा तरी उपयोगी पडतील म्हणून ती तशीच भिजत राहू दिली जातात आणि पख्तूनिस्तानचा प्रश्न सोडवायचा म्हणजे तरी काय करायचं? हाही प्रश्न आहेच. कारण उद्या जर खरोखरच या प्रश्नाचा निकाल लावायचा ठरलं तर त्या भागातले अफगाण पठाण, पाकिस्तान व्याप्त पठाणांशी समझौता करून, पख्तूनिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण होईल, ते अफगाणिस्थानालाही नको आहे. एक तर अफगाणिस्थानचा काही भाग पख्तूनिस्तानात जाईल तो धोका आहेच, शिवाय पख्तूनिस्तानच्या प्रश्नासारखा हुकुमी एक्का अफगाण सरकारला आपल्या हातातून घालवायचा नाही. मग इथे तराकीचे राज्य असो नाही, तर दाऊद खानचे राज्य असो.

अगदी अलीकडेच, म्हणजे अफगाणिस्थानात नवीन सरकार आल्यावर पाकिस्तान अफगाणिस्थानशी बोलणी करायला तयार झाले होते. तेव्हा अफगाणिस्थानने अट घातली की, ती बोलणी करताना भारतानेही उपस्थित असायला हवं. कारण पश्तूनिस्तानचा प्रश्न हा अखंड भारत असतानाचा प्रश्न आहे. म्हणून पाकिस्तान बरोबर भारतानेही यामध्ये भाग घेतला पाहिजे. त्याला पाकिस्तानने अर्थातच मान्यता दिली नाही आणि त्याबाबतीत काही झालेच नाही. खुद्द गफारखान यांचा मुलगा वलीखान सध्या पाकिस्तानमधल्या राजकारणात एवढा गुंतला आहे की, पश्तूनिस्तानसारख्या 'लहानशा' (त्याच्या दृष्टीने) प्रश्नावर स्वतःचे political career फुकट घालवणं हे तो शहाणपणाचे समजत नाही. जिथे त्यांचे स्वतःचेच लोक त्यांना मदत करू शकत नाही तिथे भारत त्यांना काय मदत करणार? तीस वर्षांपूर्वी आपल्या नेत्यांनी गफारखानांना शब्द दिला होता तो प्रामाणिक हेतूनेच दिला असेलही; पण मग त्या 'माकडीण आणि तिचं पोर' या गोष्टीसारखी स्थिती झाली. भारतीय नेते राजकीय मुत्सद्दीपणात कमी पडले आणि जेव्हा त्यांच्या स्वतःच्याच डोक्यावरून पाणी जाऊ लागलं तेव्हा त्यांनी त्या माकडीणीसारखं पोराला पायाखाली घेतलं. आता तर तीस वर्षांत जगाचंच राजकारण केवढं तरी बदललं आहे. आज इच्छा असूनही त्याबाबतीत कुणालाच काही करता येण्यासारखं नाही. ब्रिटिशांच्या devide and rule या तत्त्वावर आणि स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय उपखंडाच्या बदलत्या राजकीय तणावांवर गफारखानांच्या रूपाने जुन्या काळची प्रांजळ, हिंमतवान निष्ठा बळी गेल्यासारखी वाटते.

## आम्ही कोण?

बोलता बोलता गफारखान एकदा म्हणाले होते, 'पूर्वी इथे या भागात, कनिष्क राजाचं केवढं तरी बलाढ्य साम्राज्य होतं. तेव्हा आम्ही सगळे बुद्धधर्मीयच होतो. मग नंतर मुस्लिम इथं आले आणि आम्ही मुसलमान झालो. इस्लाममुळे जगातल्या इतर ज्ञानाचे सगळे दरवाजे आम्हाला बंद झाले, म्हणून आम्ही असे मागासलेले राहिलो आहोत...'

गफारखानाचे उद्गार ऐकून मी थक्क झाले होते. एका मुस्लिम माणसाकडून अशा तऱ्हेची कबुली येणं ही फार महत्त्वाची गोष्ट आहे आणि तेवढीच विरळा. पण अलीकडे जगातल्या सर्वच मुसलमानांना, विशेषतः जिथे इस्लामच्या अगोदर प्रगत संस्कृती नांदत होती अशा देशातील मुसलमानांना 'आम्ही खरे कोण?' हा प्रश्न सतावतो आहे.

इराणमधली इस्लामपूर्व आर्यसंस्कृती, सायरस राजाचे साम्राज्य, ससानियन, संस्कृती याबद्दल इराणी लोकांना केवढा अभिमान! इंडोनेशिया, थायलंड इथेही इस्लामपूर्व काळात अस्तित्वात असलेल्या रामायण-महाभारताबद्दल केवढं कौतुक! तेवढं कौतुक भारतामध्ये नाही. अफगाणिस्थानातही बौद्धधर्मीय राजांचं केवढं तरी बलिष्ठ आणि प्रगत साम्राज्य होतं. त्या संस्कृतीबद्दल अभिमान वाटावा असे अवशेष आजही अफगाणिस्थानातील बामीयान, हड्डा (नग्नहार), फंदुकिस्तान, सुर्खकोटल वगैरे ठिकाणी, अफगाणिस्थानभर विखुरलेले आहेत. कुणालाही आपल्या राष्ट्रीय अस्मितेची पाळंमुळं खोलवर रुजलेली हवी असतात. पण मग इस्लामपूर्व संस्कृतीच्या वारशाबद्दल अभिमान बाळगला तर इस्लामशी प्रतारणा केल्यासारखी होते आणि मग हे की ते अशा द्विधा मनःस्थितीत माणूस सापडतो.

अलीकडे जगभर इस्लामी पुनरुत्थान चालले आहे. त्यामागच्या प्रेरणांचा विचार करताना या मुद्याचाही विचार करायला हवा.

दर चार वर्षांनी कुशाणकाळ, कनिष्काचे साम्राज्य यावर जागतिक संमेलन भरते. कधी रशियामध्ये, कधी भारतामध्ये तर कधी अफगाणिस्थानात. म्हणजे जिथे जिथे कनिष्क राजाचे, त्याच्या मुलानातवंडांचे साम्राज्य होते त्या त्या ठिकाणी. त्यासाठी यूनेस्कोकडून पैसा मिळतो. आता आतापर्यंत या संमेलनामध्ये निबंध वाचणारे बहुधा भारतीय किंवा पाश्चात्य अभ्यासूच असत. कुशाणांची संस्कृती अफगाणिस्थानात फार मोठ्या प्रमाणात पसरलेली असूनही, निव्वळ यूनेस्को पैसा देते आहे म्हणून भाग घ्यावा, एवढ्या उदासीनतेने अफगाणिस्थानातले अभ्यासू भाग घ्यायचे. इस्लामपूर्व काळातील सर्वदृष्टीने प्रगत असलेल्या संस्कृतीबद्दल अभिमान कसा बाळगावा? तसा अभिमान बाळगला तर इस्लामशी प्रतारणा केल्यासारखी होते का? जुन्या संस्कृतीशी मुसलमानांनी कोणत्या आधारावर दुवे जोडायचे? हे व यासारखे प्रश्न त्यांना भेडसावीत. पण अलीकडे ३-४ वर्षांत मात्र आणि विशेषतः नवीन मार्क्सिस्ट सरकार आल्यानंतर या लोकांनी कुशाणांचा सांस्कृतिक वारसा अभिमानाने मान्य करायला आरंभ केला आहे. इथल्या बौद्धकाळाबद्दल अभिमानाने बोलायला त्यांना संकोच वाटेनासा झाला आहे. अर्थात सध्या तरी ही फक्त अॅकॅडेमिक सुरुवातच आहे. याचे कारण कुशाणांच्या प्रेमापेक्षाही इथल्या इस्लामी संस्कृतीचं प्रेम कमी करायचं हेही असू शकतं. नाही तर सर्वसाधारणपणे, ठिकठिकाणच्या जुन्या संस्कृतींच्या अवशेषांना बघायला जगातले श्रीमंत प्रवासी येतात, त्यामुळे फायदा होतो, एवढंच त्याचं महत्त्व मानलं जातं.

मि. अझीझसारख्या आधुनिक जगातल्या नवीन विचारप्रवाहांचा ज्याने अभ्यास केला आहे, अशा माणसाचे विचार मात्र स्पष्ट असतात. अझीझ डेन्मार्कमध्ये साडेतीन वर्षं मानववंशशास्त्राचा अभ्यास करीत होते. आणखी सहा महिन्यांनी परीक्षा झाल्यावर त्यांना त्या विषयाची डॉक्टरेट मिळाली असती. अझीझ यांनी सांगितल्याप्रमाणे, तेव्हा सरकारला वाटले की, (त्या वेळी दाऊदखानचे सरकार होते) जर या माणसाला डॉक्टरेट मिळाली तर हा परत अफगाणिस्थानात येणार नाही. म्हणून मग अझीझ यांना साडेतीन वर्षांनीच घाईघाईनं बोलावून घेण्यात आलं. इथे पुष्कळ वेळा असं होतं. परत आल्यावर अझीझ यांना काबूल म्युझियमच्या असिस्टंट डायरेक्टरची जागा देण्यात आली.

एकदा म्युझियम पहायला गेलो होतो तेव्हा त्यांची ओळख झाली होती. 'नूरिस्तानचा विभाग फारच चांगला आहे.' असं म्हटल्यावर अझीझ खूष झाले. कारण त्या विभागाची मांडणी वगैरे सगळे त्यांनीच केलं होतं. तियल्या वस्तू किती जुन्या आहेत, कशा मिळवल्या, कधी मिळाल्या, कुठे मिळाल्या, त्यांचं महत्त्व वगैरे सगळी माहिती सांगत अझीझ म्हणाले. '१८९६ मध्ये नूरिस्तानच्या सगळ्या

लोकांना अब्दूर रहमानने जबरदस्तीने मुसलमान केलं. तिथल्या लहान मुलांना जुन्या आठवणीसुद्धा राहू नयेत म्हणून सगळ्या लहान मुलांना काबूलला आणून नवीन शिक्षण, नवीन वातावरण दिलं. ही फार वाईट गोष्ट केली गेली. असं व्हायला नको होतं. नूरिस्तान-सारखा एवढासा भाग non muslim राहिला असता तर बाकीच्या अफगाण मुस्लिमांना काहीही धोका नव्हता. त्यांना मुसलमान केलं आणि आमच्या देशात असलेली, जगाच्या इतिहासातली एक अतिशय जुनी, colourful, वैशिष्टयपूर्ण अशी संस्कृती नाहीशी झाली. असं व्हायला नको होतं. फार मोठी चूक झाली ती. अजूनही आमचे लोक इस्लामची उगाचच टिमकी वाजवत असतात. आमच्या देशाचे ऐतिहासिक, सांस्कृतिक संदर्भच लक्षात घेत नाहीत हे लोक. एखादा माणूस काय किंवा देश काय एकदम आकाशातून थोडाच पडतो? दिवसातून पाच वेळा नमाज पढला म्हणून तो मुसलमान होत नाही की आपला जुना सांस्कृतिक वारसा जपला म्हणून कोणाचा इस्लाम बुडत नाही. मी १५–१६ वर्षांचा होतो तेव्हा नमाज पढायला लागले की, मुलींचेच विचार यायचे. तेव्हा मला वाटायचं, माझा धर्म बुडाला. पण मी अजून मुसलमान आहेच की!'

नूरिस्तानच्या बिगर मुस्लिमांना बळजबरीने मुसलमान केले म्हणून अझीझ एवढे हळहळत होते, ही विलक्षण आश्चर्य वाटण्यासारखी गोष्ट होती. बळजबरीच्या इस्लामीकरणाबद्दल आणि इस्लामबद्दल एवढ्या सडेतोडपणे बोलणारा मुसलमान, ही एक कधीही न घडणारी गोष्ट होती.

'तुम्ही आता श्रद्धेनं नमाज वगैरे पढता की नाही?' या माझ्या प्रश्नावर डोळे बारीक करीत ते नुसतेच हसले. ते उत्साहाने नुसते खदखदत होते. परदेशात जाऊन नवीन ज्ञान मिळवून आपल्या देशात परत आलं की, कुणालाही, विशेषतः तरुण माणसाला, हे करू, ते करू असं होत असतं. पण सरकारच्या ठोकळेबाज ठराविक धोरणांमुळे त्याला काही करता मात्र येत नाही, तेव्हा अतिशय वैफल्य येतं. तशा प्रकारचं वैफल्य आलेले अझीझ होते. (असे लोक भारतातही भरपूर आहेत.) त्या वेळच्या दाऊद सरकारला खूप नावं ठेवत होते. पण अगदी हळू आवाजात बोलत होते. म्हणाले, 'मी नुकताच परदेशात जाऊन आलोय ना, म्हणून माझ्यावर फार लक्ष आहे सरकारचं. मी बोललेला प्रत्येक शब्द वर रिपोर्ट केला जातो. आमच्या देशात हेरगिरी खूप चालते. ज्या सरकारचा आपल्याच लोकांवर विश्वास नाही ते सरकार कशा प्रकारचं राज्य करत असेल पहा. त्या दृष्टीनं तुम्ही फार चांगले लोक आहात. सगळा खुल्लंखुल्ला कारभार. despotic Govt. तुमच्याकडे टिकूच शकत नाहीं ही केवढी wonderful गोष्ट आहे!' त्या वेळी नुकत्याच निवडणुका होऊन इंदिरा गांधी हरल्या होत्या.

अझीझ यांना किती बोलू आणि किती नको असं झालं होतं. ते म्हणाले, 'आमच्यासारख्यांच्या हातात जर उद्या सत्ता आली ना, तर आम्ही सगळ्या परदेशी लोकांना अफगाणिस्थानच्या बाहेर घालवून देऊ.'

'रशियन्स आणि अमेरिकन्सनासुद्धा?'

'त्यांना तर सर्वांत अगोदर हाकलून देऊ. त्यांचा पैसा, त्यांचे तंत्रज्ञ आणि त्यांचे ते 'ईझम्स' आम्हाला काहीच नकोय त्यांचं. खरं म्हणजे सगळ्या आशियातूनच त्यांना हाकलून द्यायला हवं. पण आमचं ऐकतं कोण? आमची गरिबी, आमचे प्रश्न, आमच्या अडचणी, आमचं आम्हाला काय ते करू दे. पण त्या बाबतीत भारतासारखे मोठे राष्ट्र काहीच काही करत नाही म्हणून मग रशिया–अमेरिकेचं फावतं. आमच्यासारख्या छोट्या राष्ट्रांच्या डोक्याव येऊन बसतात मग त्यांचे ईझम्स.'

'बरं, पण तुम्हाला भारताची तरी मदत हवी की नको?'

'नको. आर्थिक मदत हवी. पण आम्हाला advisers नकोत. please, no personal dealings, बरं का? तुमच्या ज्ञानाबद्दल भरपूर आदर आहे आम्हाला. पण तुम्ही लोक आलात की, आमचे लोक कामच करीत नाहीत. आयतेपणाची सवय लागली आहे आमच्या लोकांना. कारण त्यांना आता कळून चुकलं आहे की, जगातला प्रत्येक देश आम्हाला मदत द्यायला उत्सुक आहे. तुम्ही नाही तर तुमचा काका. आणखी कोणी आम्हाला मदत देईलच आणि खरं ते स्पष्टपणानं सांगायचं म्हणजे आम्हा लोकांना भारतीयांबद्दल काही फारसं प्रेम आहे असं नाही. तुम्ही रशियाचे मित्र आहात म्हणूनच फक्त तुम्ही इथे आहात. कदाचित आत्ताआत्तापर्यंत तुम्ही लोकही आमच्याएवढेच मागासलेले होतात आणि आता मात्र तुम्ही केवढी तरी प्रगती करून घेतलीत म्हणून आमच्या मनात असूया, द्वेषही असेल. काही सांगता येत नाही.'

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी अझीझना, त्यांच्या बायकोसह चहाचं आमंत्रण दिलं. पण ते काही आले नाहीत. बरीच वाट पाहून शेवटी त्यांनी दिलेल्या नंबरवर फोन केला. अगोदर कुणा म्हाताऱ्या माणसानं फोन घेतला होता. अझीझ यांच्याशीं बोलायचं म्हटल्यावर 'क्षणभर थांबा, बोलावतो.' या वाक्यानंतर अझीझ स्वतःच फोनवर बोलू लागले. पण रानडे म्हटल्यावर म्हणाले, 'अझीझ? कोण अझीझ? इथं कोणी अझीझ रहात नाहीत. म्युझियमचे डे. डायरेक्टर? नाही ...नाही ..चुकीचा नंबर...'

मी मुकुंदाला म्हटलं, 'हे काय प्रकरण आहे?'

तो म्हणाला, 'काल फार बडबड केली की काय असं वाटून बच्चू घाबरला की काय?'.

नवीन राजवट सुरू झाल्यावर चार–पाच महिन्यांनी आम्ही आडून आडून चौकशी केली तेव्हा कळलं की, सध्या मि. अझीझ तुरुंगात आहेत. □

---

# जिथून टोळधाडी आल्या....

---

भारत व अफगाणिस्थान यांच्या दरम्यान चालणाऱ्या मंत्री, उपमंत्री वगैरेंच्या भेटीगाठी, ॲम्बॅसॅडर्सची येणीजाणी किंवा इतर काही संयुक्त कार्यक्रम असले की दरवेळी, भारत–अफगाणिस्थानच्या मैत्रीचे, सांस्कृतिक दृढसंबंधांचे, जुन्या ऐतिहासिक दृढसंबंधांचे गोडवे गायले जातात. इतके की दरवेळी तेच तेच ऐकूनऐकून आता ती

ठराविक भाषणं हास्यास्पद वाटायला लागली आहेत. एकवेळ मैत्रीचे संबंध, सांस्कृतिक देवाणघेवाण, ठीक आहे; पण जुन्या ऐतिहासिक संबंधाबद्दल कोणी बोलायला लागलं की, मला तरी अतिशय अस्वस्थ व्हायला होतं. एक चंद्रगुप्त मौर्यांचा काळ आणि रणजितसिंगच्या वेळची काही वर्षं सोडून दिली तर इतर वेळी अफगाणिस्थानातून येणाऱ्या टोळीवाल्यांच्या हल्ल्यांना तोंड देतादेता भारतीयांचा जीव सतत मेटाकुटीला आला होता आणि त्याची भरपूर जाणीव अफगाण लोकांना आहे. 'आम्ही कधीच कुणाचे गुलाम नव्हतो.' असं अतिशय गर्वानं म्हणतात ते लोक. आणि मग 'ब्रिटिशांकडून स्वातंत्र्य मिळवायला तुम्हाला दोनशे वर्षं कशी काय लागली बुवा?' असा प्रश्न विचारून आपल्याला खजिल करतात. एवढंच नव्हे तर, 'खरं म्हणजे मोंगलांचेही तुम्ही तात्त्विकदृष्ट्या गुलामच होतात. मोंगलांना आम्ही इथून हाकलूनच दिलं. म्हणून ते पुढे हिंदुस्थानातच स्थायिक झाले, वगैरे तो भाग सोडून द्या. पण मुळात तुम्ही मोंगलांचे गुलामच. मोगल बादशहांचं तुम्हाला एवढं कौतुक कसं काय वाटतं कुणाला ठाऊक?' एवढं मोठं भाषण द्यायलाही ते लोक कमी करत नाहीत.

'एकदा नाही, दोनदा नाही, सोळा वेळा आमच्या सुलतान महमदानं तुमच्यावर स्वाऱ्या केल्या, दरवेळी तुम्हाला लुटलं. पण एकदासुद्धा तुम्ही त्याचा पराभव कसा करू शकला नाहीत? काय करत काय होतात तुम्ही? शेवटी महमदच दमला आणि मरून गेला बिचारा.' पायंडाखानच्या या चेष्टा कम हिणवणं अशा बोलण्यावर कसंबसं हसून आम्हीं म्हणतो, 'तुमचा महमदच काय पण तुमच्या अब्दालीनेही लुटलंच आम्हाला. प्रत्येकानं आम्हाला लुटलंच. हिंदुस्थानातून अमाप संपत्ती आणलीत तुम्ही. पण त्या सगळ्या संपत्तीचं केलंत काय तुम्ही? एवढी संपत्ती लुटून आणूनही तुमचा देश दरिद्री तो दरिद्रीच. तुम्हाला अजूनही आमच्याकडून मदत हवीच आहे. आमचा पैसा हवा आहे. आमचे तंत्रज्ञही हवे आहेत. अगदी राज्य कारभार चालवण्यासाठी plannig चे लोकही हवेत तुम्हाला आमचे. काय आहे काय हे?' आमच्या बोलण्यावर पायंडाखानही मग कसनुसं हसतो, आमच्याच सारखं आणि आम्हाला दोघांनाही जाणीव असते की, दुसरा बोलला ते कडू लागलं तरी ते सत्य आहे. म्हणूनच वाटतं की कुणी निदान ऐतिहासिक दृढसंबंधांचे नसते डांगोरे पिटू नयेत.

इस्लामवर एवढी गाढ श्रद्धा असलेला आणि तरीही आधुनिक जगात घट्ट पाय रोवलेला मुसलमान, पायंडाखानसारखा दुसरा पाहिला नाही. तसं म्हटलं तर स्वतःला अस्सल मुसलमान म्हणवणारे सगळेच असतात. पण रोझे सुरू झाले की, यांच्या असलीपणाचं पितळ उघडं पडतं. चोरूनमारून का होईना पण सगळेजण दिवसा खातपीत असतात. सांगतात मात्र की, आमचा रोझा आहे, पण पायंडाखान मात्र खरोखर महिनाभर उपास काढतो. रोझे संपल्यानंतर ईदच्या दिवशी, महिन्याभरानंतर पायंडाखान निम्मा झालेला असतो, रंग काळवंडून गेलेला असतो. त्याला बोलतानासुद्धा त्रास होतो.

'तुझ्यासारख्या इंजिनियरिंगसारख्या आधुनिक शास्त्राच्या ग्रॅज्युएट मनाला हे असले उपासतापास कसे पटतात? त्यावर विश्वास कसा बसतो?'

या आमच्या प्रश्नावर त्याचं उत्तर असतं,

'विश्वास बसतो तर. इंजिनियरिंगचे जे नियम आहेत ते जर मी पाळले नाही तर मी इंजिनिअर कसला? त्याप्रमाणे इस्लामचेही काही नियम आहेत ते मी पाळले नाहीत तर मी मुसलमान कसला? जे लोक रोझे पाळत नाहीत ते चूकच करतात. आधुनिक काळ झाला म्हणून काय झालं? उपास न झेपायला काय झालं? रात्री जास्त जेवावं. श्रद्धा असली की सगळं जमतं.'

एकदा रस्तारुंदीचं काम सुरू होतं. मध्ये एक लहानशी मशीद येत होती. भारतामध्ये अशी मशीद पाडण्याचं कुणी म्हटलं तरी काय गदारोळ होतो ते मुकुंदला माहीत होतं. पण पायंडाखान मात्र झटकन् म्हणाला, 'रस्ता महत्त्वाचा. मशीद काय इथं नाही तर दुसरीकडे बांधता येईल. हजारो लोकांना सोयीच्या रस्त्यापुढे मशिदीचं काय महत्त्व? पाडून टाका.' एकीकडे उपासातापासावर एवढी श्रद्धा असलेला पायंडाखान मशीद पाडण्याला चट्कन तयार झाला होता.

पायंडाखान बोलायला लागला की, त्याचे डोळे, चेहरा खूप ताणला जातो. अतिशय आवेशानं बोलतो. रशियाधार्जिण्या नव्या सरकारचा कट्टर विरोधी, नॅशनॅलिस्ट कम्युनिस्ट आणि आत्यंतिक राष्ट्रवादामुळे, कट्टर इस्लामी श्रद्धेमुळे संकुचित विचारांचाही आहे. याचा रशिया द्वेष एवढा आहे की, त्याला रशियाने स्कॉलरशिप दिली होती तरी त्याने ती नाकारली होती. नवीन, क्रांतिकारी डावे सरकार सत्तेवर आल्यावर सगळ्यांना वाटले होते, 'पायंडा आता संपला. त्याला मारला नाही तरी निदान हा तुरुंगात तरी खितपत पडणार. पण पहिले सहा महिने त्याला नोकरीवरून काढून टाकले होते आणि नंतर नोकरीवर घेतले. पण अतिशय त्रासाच्या, कटकटीच्या रस्ता-बांधणीच्या कामावर मुकादम म्हणून नेमले.

नवीन राजवटीबद्दल अतिशय चिडीनं बोलतो नवीन राजवट आल्यावर अगदी सुरुवातीलाच एकदा म्हणाला होता, 'रशियानं ताजिकिस्तान किंवा उजबेकिस्तानला 'आपलं' म्हटलं तसं आता आमच्यावरच्या प्रेमानं आमच्या अफगाणिस्थानलासुद्धा 'आपलं' म्हणेल की काय ही भीती आहे आम्हाला. पण यावेळी रशियाला ते एवढं सोपं जाणार नाही, एवढं मात्र खरं. आम्ही कधीही कुणाचेही गुलाम नव्हतो.

ब्रिटिशांसारख्यांना सुद्धा आम्ही पुरून उरलो. रशिया कदाचित आम्हाला जड जाईल. कारण आमचेच काही लोक त्यांना सामील झाले आहेत; पण आम्ही या आमच्या गद्दार लोकांनाही खतम करू आणि रशियालाही हाकलून देऊ!' पायंडाचं म्हणणं खरं ठरलं. नवीन राजवट सुरू झाल्यावर चार महिन्यांतच लोक बंड करून उठले आणि ठिकठिकाणी उठाव होऊ लागले. पायंडा 'ताजिक' टोळीवाल्यांपैकी आहे. म्हणजे इलिट् क्लासवाला. त्याचे बंडखोरांशी संधान ठेवणारे underground उद्योग सुरू असावेत असा मला आपला संशय आहे.

रशियाधार्जिण्या अफगाण सरकारशी भारताने मैत्रीचे संबंध ठेवले आहेत याचा त्याला फार राग आहे. मोरारजी देसाई आणि ब्रेझनेव्ह यांच्या भेटीनंतर एकदा बातमी आली होती (B. B. C. ने ती बातमी दिली होती.) की मोरारजी देसाई अफगणिस्तान–पाकिस्तानमध्ये समझोता करून आणणार आहेत. याचाच अर्थ तराकी सरकार टिकून रहाणार आहे. म्हणजेच रशि-

याच महत्त्व तसंच राहणार आहे. ही बातमी ऐकल्यावर अफगाणिस्तानचे लोक अतिशय नाराज झाले. पायंडा ऑफिसमधल्या दुसऱ्या एका भारतीय इंजिनिअरला म्हणत होता, 'तुमचा मोरारजी वेडा वगैरे आहे की काय? रशियाच्या बाजूने आमच्या भानगडीत कशाला पडतोय तो?'

त्यावर त्या भारतीय इंजिनिअरनं उत्तर दिलं, 'मोरारजी वेडा आहे की नाही ते काही मला माहीत नाही; पण आमच्या देशात जर असं कुणी प्राईममिनिस्टरला वेडा वगैरे म्हटलं तर तो माणूस तुरुंगात जात नाही!'

पायंडा गप्प बसला. त्याला भारताबद्दल द्वेषही नाही की मैत्रीही वाटत नाही. भारतातल्या लोकसत्ताक राज्यपद्धतीचा मात्र त्याला हेवा वाटतो आणि आश्चर्यही. इंदिरा गांधींसारख्या बाईला आपण रक्ताचा एक थेंबही न सांडता घालवू शकलो याचा त्याला विलक्षण अचंबा वाटतो. कौतुकही वाटतं.

अगदी अलीकडेच त्याचं लग्न झालं म्हणून त्या दोघांना घरी जेवायला बोलावलं होतं. त्या दिवशी सकाळी ७ वाजताच आला आणि म्हणाला, 'सॉरी, आज जेवायला येणं काही जमणार नाही. कारण माझा मेव्हणा–तो आर्मीमध्ये आहे–काल जलालबादजवळ चाललेल्या लढाईत मारला गेला. आज त्याची बॉडी इथं येणार आहे. मग 'जनाजा' वगैरे सगळे सोपस्कार सुरू होतील. तेव्हा आम्ही काही जेवायला येणार नाही!' हे सांगताना पायंडा मेव्हण्याच्या मृत्यूबद्दल दुःखी वगैरे दिसण्याऐवजी, कसल्या तरी ताणाखाली असलेला दिसत होता. एकंदरीतच अफगाण माणसाला अगदी आपल्या जवळच्या आप्ताच्या मृत्यूचंही दुःख फारसं होतच नाही. 'मुर्दामिशा' (मेला) म्हटलं की त्याचा त्या माणसाशी संबंध संपतो. पायंडा जाता जाता म्हणाला, 'अशी आमची किती माणसं आणखी मरणार आहेत कुणास ठाऊक?'

आर्मीतला अफगाण माणूस बंडखोर अफगाण माणसाशी गेले ७–८ महिने लढतो आहे. सुरुवातीला सर्वसाधारण समजूत होती की ते खरोखरच बंडखोर आहेत; पण आता त्यांच्या 'बंडखोरी' बद्दलच लोकांच्या मनात संशय निर्माण झाला आहे; सरकारविरुद्ध लढणारे हे बंडखोर नसून, परकी सत्तेच्या कबजात गेलेल्या आपल्या परधार्जिण्या सरकारला, इस्लामला धोक्यात आणणाऱ्या सरकारला उलथून अफगाणिस्तान करू पहाणारे हे तर देशभक्तच आहेत अशी भावना, सामान्य लोकांतच काय पण आर्मीमध्येही येऊ लागली आहे. म्हणूनच कुठे कुठे आर्मीही बंडखोरांना आता सामील होऊ लागली आहे.

अफगाणिस्तानात घडणाऱ्या या सगळ्या घटनांशी भारताचा संबंध काय? अफगाणिस्तानात काय घडते आहे, काय घडणार आहे, हे आपल्या दृष्टीने फार महत्त्वाचे प्रश्न आहेत. इथे जे काय घडते आहे, घडणार आहे त्याच्याशी फार जवळचा आपला संबंध आहे. अफगाणिस्तानात रशियाधार्जिणे सरकारच राहिले किंवा 'इस्लाम ब्रदरहूड'वाल्या **Fanatic Muslims** चं सरकार आलं. तर भारतापुढे मोठा प्रश्न पडणार आहे तो असा की इस्लाम ब्रदरहूड आणि कम्युनिझमपैकी कमी धोकादायक कोण आहे? आज भारत आणि अफगणिस्तानच्या मध्ये पाकिस्तान आहे; भारतामध्येही मुस्लिमलीगच्या आणि कम्युनिस्टांच्या कारवाया चालूच आहेत. तरीसुद्धा एक गोष्ट आपल्याला विसरून चालणार नाही की, भारतखंडाचा सगळा इतिहासच बदलून टाकणाऱ्या टोळधाडी भारतवर आल्या, थेट आर्यांपासून ते नादीरशहापर्यंत–त्या सगळ्या अफगाणिस्तानातूनच आल्या होत्या. म्हणूनच अफगाणिस्तानात काय घडते ते भारतीयांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

---

# टॅन्क्स, गोळीबार, धूर....जसेच्या तसे....

---

**११** एप्रिल १९७९. सकाळी १०॥–११चा सुमार असेल. मुकुंदाला (मि. रानडे) इथल्या फॉरेन मिनिस्ट्रीत काम होतं म्हणून तो तिकडे निघाला होता. फॉरेन मिनिस्ट्रीची बिल्डिंग अर्गपॅलेसच्या बाजूलाच आहे. नवीन सरकारने पूर्वीच्या अर्गपॅलेसला, "खल्क पॅलेस' (जनतेचा राजवाडा) हे नवं नाव देऊनही बहुतकरून लोक अजूनही अर्गपॅलेसच म्हणतात. तर त्या बाजूला गेल्यावर कळलं, की पॅलेसच्या बाजूला जाणारे दोन मुख्य रस्ते बंद केले आहेत. दुतर्फा आर्मीचे लोक उभे होते. पॅलेसच्या बाजूने गोळीबाराचा आवाज ऐकू येत होता. धुराचे लोट वर आकाशात जाताना दिसत होते. मुख्य रस्त्यावरून मिलिटरी टॅन्क्स पॅलेसच्या दिशेने घाईघाईनं गडगडत जात होते.

झालं! भयंकर घबराट पसरली. 'होणार' 'होणार' म्हणून म्हटली जाणारी प्रतिक्रांती सुरू झाली असंच सर्वांना वाटलं. धावपळ सुरू झाली. रस्ते ओसाड पडू लागले. दुकानं आपोआपच फटाफट बंद झाली. पॅलेसच्या जवळ असलेल्या ऑफिसेसमधल्या परकीयांनी आपल्याला घरी निघून जायला सुरवात केली. कारण त्यांच्या वकिलातींकडून त्यांना तशाच सूचना मिळालेल्या आहेत, की गावात काही गडबड सुरू झाली की प्रत्येकानं आपल्या घरीच रहावे.

मुकुंदानं ठरवलं, की घरी नंतर जाऊया, त्या अगोदर अर्ग पॅलेस कडे एक चक्कर टाकून येऊ या. ऑफिसचा ड्रायव्हरही होती. शिवाय प्रतिक्रांती सुरू झाली आहे म्हणजे आपलेच लोक अधिकाकारावर येणार! ड्रायव्हर लगेच तयार झाला.

दोन्ही मुख्य रस्ते बंद म्हणून मुकुंदा मागच्या बाजूने, म्हणजे अफगाण रेडिओ, टि. व्ही. च्या बाजूने निघाला. जरासं जवळ जाऊन पहातो तर अफगाण रेडिओ, टि. व्ही. बिल्डिंग समोर टॅन्क्स उभा आणि बिल्डिंगवरच गोळीबार सुरू होता! पुन्हा मागे वळले आणि बाजूच्या एका लहानशा गल्लीतून पुढे चालले. वळणावर समोरून एक भली मोठी लांबलचक गाडी येत होती म्हणून जरासे थांबले. समोरच्या गाडीत पहातो तर आपल्या राजदूतावासातील खूपच बडे ऑफिसर बसलेले होते. असं भलत्याच वेळी एकमेकांसमोर पाहून दोघंही दचकले. कारण दोघंही नको त्यावेळी 'परिस्थितीची पहाणी' करायला बाहेर पडलेले!

मुकुंदा तसाच पुढं गेला. पॅलेसच्या उजव्या बाजूला पोचला.

समोरच्या चौकात टॅन्क्स, गोळीबार, धावपळ, धूर सगळं दिसत होतं गोळीबाराचे आवाज सुरू होऊन आतापर्यंत पाऊणतास झाला होता. आणि मग एकदमच फायरिंग थांबलं. टॅन्क्स मुकाटयाने मागच्या मागे निघून जाऊ लागले. आर्मी लोकांची गर्दी नाहीशी झाली. धूर कमी झाला. ट्रॅफिक पोलिस कुठून तरी आला, आणि ओसाड पडलेल्या रस्त्यांमध्ये पुन्हा जाग आली.

हा काय प्रकार झाला कुणालाच कळेना. मुकुंदाने मग सरळ ट्रॅफिक पोलिसालाच विचारलं. त्याच्या गाडीचा सरकारी नंबर, आत बसलेला हिंदुस्थानी माणूस पाहून त्या ट्रॅफिक पोलिसाने मुकुंदालाच खडाक् करून सलाम ठोकला आणि अभिमानाने म्हणाला, ' आत्ता इथं आम्ही सौर (एप्रिल) क्रांतीची फिल्म घेतली ! '

अफगाण फिल्म्समध्ये एक भारतीय तज्ञ आहेत. त्यांच्याकडे चौकशी केली. त्यांनी माहिती सांगितली ती अशी;

गेल्या वर्षी एप्रिलमध्ये झालेल्या क्रांतीवर डॉक्युमेंटरी काढण्याचे सरकारचे ठरले होते. फक्त दिवस ठरला नव्हता. काल संध्याकाळी संध्याकाळी आम्हाला सांगितलं, की आज सकाळपासून शूटिंग सुरू. डॉक्युमेंटरी अगदी खरोखरीची दिसायला हवी म्हणून पॅलेस भोवतीनं टॅन्क्स आणून गोळीबार वगैरे करायचा ठरला. अगदी गेल्या वर्षी घडल्या सारखंच. तेव्हा मी त्यांना सांगितलं की त्याबद्दलची सूचना अगोदरच लोकांना दिलेली बरी. नाहीतर गावात अगोदरच घबराट आहे. तो आणखीनच वाढेल. तेव्हा आर्मीचे जनरल म्हणाले, नाही... नाही...आम्हाला अगदी खरोखरचं वातावरणच हवं आहे, आपण गोळीबार सुरू केला, की लोक घाबरतील, पळापळ सुरू होईल, ते सगळं जसंच्या तसंच ' शूट ' तुम्ही लोकांनी करायचं..

आर्मीच्या लोकांनी जसं सर्वसाधारण लोकांना काही सांगितलं नाही, तसंच निरनिराळ्या वकिलातींनाही सूचना दिली नव्हती. त्यामुळे गोळीबार सुरू झाल्यावर, वकिलातीतले वरिष्ठ अधिकारी आपापल्या गाड्यांना स्वतःचे ध्वज न लावताच गावातून चकरा मारत होते. उत्साहाच्या भरात आर्मीच्या लोकांनी खुद्द तराकी, अमीन यांनाही काहीच सांगितले नव्हते. त्यामुळें फायरिंग सुरू झाल्यावर दोघंही नाही म्हटलं तरी सरपटले होतेच. धडाधडा फोन केले तेव्हा कुठं त्यांना कळलं, की पॅलेसवर गोळीबार झाला होता तो सौरक्रांतीच्या डॉक्युमेंटरीसाठी !

**स मा प्त**

पुस्तके

# शैक्षणिक परिवर्तनाचे मूलगामी व सर्वस्पर्शी चिंतन

सध्याची शिक्षणपद्धती बदलली पाहिजे असं मत सर्वसाधारणपणे सगळेच व्यक्त करतात, पण बदलली पाहिजे म्हणजे नेमकं काय करायला हवं, हे फारच थोडे जण सांगू शकतात. विशेषतः भाषणबाजी करणाऱ्या आणि ' शोषितांची पिळवणूक ' ' पददलितांना न्याय ' अशा सारखे शब्द वापरण्याची हौस असणाऱ्या नेत्यांना ' प्रस्थापित रचनेचे उच्चाटन ' वगैरेचेही भलतेच आकर्षण असते. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे विद्यमान अध्यक्ष, मुंबईचे प्रा. बाळ आपटे यांनी लिहिलेल्या Educational Change या पुस्तकात देखील प्रचलित शिक्षणपद्धतीचा फोलपणा दर्शविण्यात आला आहे; पण या पुस्तकाचे वैशिष्ट म्हणजे शैक्षणिक बदलाच्या कल्पनेचा प्रा. आपटे यांनी केलेला विविधांगी आणि व्यावहारिक विचार.

' केवळ अभ्यासक्रमाची पुर्नविभागणी (१०+२+३ किंवा ८+४+३) करून भागणार नाही तर शिक्षणाची उद्दिष्टे, कार्यवाही, अभ्यासक्रमाची रोजगाराभिमुखता या सर्वच मूलभूत गोष्टींबद्दल नवे दृष्टिकोन बाळगून शैक्षणिक बदल घडवून आणले पाहिजेत या विद्यार्थी परिषदेच्या अधिकृतपणे जाहीर झालेल्या मताची मूलभूत बैठक.या पुस्तकाला लाभली आहे.

एकशेवीस पानांच्या या पुस्तकात शैक्षणिक बदलाच्या प्रक्रियेचा सांगोपांग विचार केलेला आहे. पहिल्या काही प्रकरणांत वर्तमान शैक्षणिक परिस्थितीचे विवरण आहे. शिक्षणाच्या उद्दिष्टांबद्दलचा आजपर्यंतचा दृष्टिकोन आणि त्याबद्दल आवश्यक असलेला योग्य आणि व्यावहारिक दृष्टिकोन यातील तफावत प्रा. आपटे यांनी दर्शविली आहे. सामाजिक बदलाच्या संदर्भात शिक्षण हे एकमेव प्रभावी साधन आहे, यावर प्रा. आपटे यांचा विश्वास आहे. ही गोष्ट स्पष्ट करण्यासाठी दिलेल्या– Schools can complete and consolidate a change decided elsewhere whether by bullets or ballots या उद्धरणाची (Quotation) चर्चा प्रा. आपटे यांनी केलेली आहे. प्रा. आपटे म्हणतात, 'शिक्षणामुळे जीवनमूल्ये आणि राष्ट्रीय आदर्श अधिकाधिक लोकभिमुख बनू शकतील आणि केवळ शैक्षणिक संस्कार आणि ज्ञान हेच संपन्न आणि यशस्वी जीवनाचे समर्थ साधन बनू शकेल.'

निखळ व्यावहारिक पातळीवरून केलेला विचार हे या पुस्तकाचे आणखी एक वैशिष्टच. शिक्षणाने भौतिक उन्नतीचे दरवाजे सामान्यांसाठी खुले केले पाहिजेत, तसेच लोकसंख्या, लोकभेद, बेकारी इ. विविध प्रश्नांवर समाधानकारक तोडगा शोधण्याची ताकद शिक्षणामुळेच लोकप्रतिनिधींमध्ये येऊ शकेल. शिक्षणाच्या उद्दिष्टांची चर्चा केल्यानंतर प्रा. आपटे ज्या निष्कर्षाप्रत येतात तो फार महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, ' Schools can decide, initiate and achieve a change in every field of social activity without bullets or ballots,

रोजगाराभिमुख शिक्षण या मुद्द्याचीदेखील विस्तृत आणि मुद्देसूद चर्चा या पुस्तकात आढळते. रोजगार हे शिक्षणाचे एकमेव किंवा मुख्य उद्दिष्ट असू नये हे मत लेखकाने विस्ताराने स्पष्ट केले आहे. स्वतंत्र विचारांची शक्ती आणि निर्णय घेण्याचे सामर्थ्य ह्यांचा विकास हे शिक्षणाचे प्रधान उद्दिष्ट असावे.

तसे ते असेल तरच शिक्षणानंतर रोजगार मिळण्याची समर्थता विद्यार्थ्यांमध्ये येऊ शकेल. सुशिक्षित बेकारीच्या प्रश्नाचा आढावा घेताना, माध्यमिक शिक्षणानंतरच्या (तिसऱ्या) टप्प्यात कला, वाणिज्य, शास्त्र या विद्याशाखांना मिळालेले अनाठायी प्रोत्साहन व तंत्रज्ञान, कृषी इ. विद्याशाखांकडे झालेले दुर्लक्ष हे बेकारीचे एक महत्त्वाचे कारण आहे ही गोष्ट लेखकाने स्पष्ट केली आहे.

## विविधांगी विचार

शैक्षणिक बदलाच्या संदर्भात प्रा. आपटे यांनी शिक्षणाशी संलग्न अशा विविध उपविषयांचाही विचार केला आहे. शिक्षणाचे व्यवसाय व रोजगार यांच्याशी कसे संबंध असावेत या विषयाची त्यांनी विस्तृत चर्चा केली आहे. 'सक्षम मनुष्यबळ, शिक्षण व ग्रामीण रोजगार' ह्या उपविषयांचाही त्यांनी सखोल अभ्यास केला आहे. मूलभूत शिक्षणाची महात्मा गांधींनी केलेली मीमांसा, कार्यानुभव व रोजगाराभिमुख शिक्षण याबाबत कोठारी आयोगाचे निष्कर्ष यांची सांगोपांग व सविस्तर चर्चा लेखकाने केल्यामुळे ह्या पुस्तकाला विशेष वजन प्राप्त झाले आहे.

शैक्षणिक बदलाची चर्चा जितकी सोपी तितकीच कार्यवाही अवघड याची पूर्ण कल्पना लेखकाला असल्यामुळे बदलाची प्रक्रिया कशी असावी याबाबत त्यांनी मुद्देसूद विवेचन केलं आहे. शारीरिक शिक्षणासारख्या एरवी दुर्लक्षिल्या गेलेल्या विषयावरही प्रा. आपटे यांनी शास्त्रशुद्ध विवेचन केलं आहे हे या पुस्तकाचं एक मोठंच वैशिष्ट्य. शिक्षणक्षेत्रातील विविध प्रयोगांचं महत्त्व विशद करून प्रा. आपटे म्हणतात की, काही निवडक शिक्षणसंस्था शैक्षणिक प्रयोगांसाठी राखीव म्हणून घोषित करण्याची आवश्यकता आहे. शिक्षक, शिक्षकांची प्रशिक्षणालये आणि विद्यापीठांचे शिक्षणविभाग हे तीन घटक लेखकांच्या मते शैक्षणिक परिवर्तनाचे 'वाहक' (एजंट) आहेत. पुस्तकाच्या अखेरच्या काही प्रकरणात शिक्षणाच्या आर्थिक नियोजनाचा जो आढावा प्रा. आपटे यांनी घेतला आहे तो सर्वस्पर्शी तर आहेच; पण मुख्य म्हणजे चुकीच्या शैक्षणिक आर्थिक नियोजनाची जी फळं आज आपण भोगत आहोत त्याची यथार्थ कल्पना देणारा आहे. राष्ट्रीय नियोजनात शिक्षण व संशोधनाकडे जे दुर्लक्ष करण्यात आलं आहे त्यावर प्रा. आपटे यांनी प्रकाश टाकला आहे.

शिक्षणाची उद्दिष्टे आणि रोजगाराभिमुख शिक्षण याबाबतचे प्रा. आपटे यांचे काही विचार वादग्रस्त ठरण्याची शक्यता लक्षात घेऊनसुद्धा शैक्षणिक परिवर्तनाचं मूलगामी, सविस्तर आणि सर्वस्पर्शी आणि मुख्य म्हणजे व्यावहारिक पातळीवर चिंतन करणारं असं हे कदाचित पहिलंच पुस्तक असेल. पृष्ठसंख्या लहान असली तरी पुस्तकाचा आवाका मोठा आहे. राधाकृष्णन, मुदलियार, कोठारी इ. सरकारी आयोगांचे अहवाल, विदेशी शिक्षणतज्ज्ञांचे विचार, महात्मा गांधी, विनोबा भावे, जे. पी. नाईक, एस. एन. मुकर्जी इ. भारतीयांचे विचार इ. चा सखोल अभ्यास लेखकानं केल्याची साक्ष पुस्तकाच्या पानापानात आढळते. इतकंच नव्हे तर गोळवलकरगुरुजी, दीनदयाल उपाध्याय इ. सारख्यांचे शिक्षणाबाबतचे चिंतनपर विचारदेखील या पुस्तकात सविस्तर चर्चिले आहेत, ही एक उल्लेखनीय बाब.

विद्यार्थी संघटनेचे नेते असल्यामुळे प्रा. आपटे आणीबाणीत कारागृहात होते. मुंबई विद्यापीठातच आपल्या अनुयायांसह त्यांनी केलेला सत्याग्रह त्या वेळी खूप गाजला होता. आपल्या दीर्घ कारावासात त्यांनी केलेल्या सखोल चिंतनाचा आणि अभ्यासाचा परिपाक म्हणजे त्यांचं हे पुस्तक! कुठल्याच काय पण संघटनेच्या नेत्यांनं एवढं चिंतनशील लिखाण करावं ही गोष्ट आपल्याला तशी अप्रुपच! त्यात पुन्हा प्रा. आपटे हे खरे कायद्याचे अभ्यासक. ह्या सगळ्या पार्श्वभूमीवर प्रा. आपटे यांचं हे पुस्तक, परिवर्तनाच्या दिशा स्पष्ट करण्याचा हा प्रयत्न, केवळ विचारप्रवर्तक नव्हे तर तुमच्या-आमच्या आदराचाही एक विषय बनतो.

**— विनय सहस्रबुद्धे**

एज्युकेशनल चेंज
प्रा. बाळ आपटे
अ. भा. विद्यार्थी परिषद दिल्ली, चे प्रकाशन.
पृष्ठे—१२० मूल्य रु. ७·५०



**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# चित्रपटाबाहेर....

के. ए. अब्बास हे हिंदी चित्रपटसृष्टीतील एक थबकायला लावणारं नाव. चित्रपट, लघुकथा, स्तंभलेखन, कादंबऱ्या, वृत्तपत्रीय लेखन अशा विविध क्षेत्रात यशस्वीपणे हात चालविणारा हा गृहस्थ आता एक त्याच्या आजवरच्या परंपरेला शोभेल अशी फिल्म काढत आहे. फिल्मचं नाव आहे–Naxalites.

नावातूनच स्पष्ट होत असलेला नक्षलवाद्यांच्या जीवनावरील हा चित्रपट आहे. असा काही विषय आपल्या चित्रपटासाठी निवडण्याचं खूळ तुझ्या डोक्यात कसं शिरलं, असं काही पत्रकारांनी अब्बासला 'नक्षलाइटस्'च्या सेटवरच गाठून विचारले. तेव्हा अब्बास म्हणाला–

'समाजव्यवस्थेमध्ये अंतर्भूत असणाऱ्या माणसाच्या दैवाबद्दल मला सतत आकर्षण वाटत आलं आहे. मी त्याने पछाडला गेलो आहे. स्तंभलेखन करताना, लघुकथा लिहिताना, माझे चित्रपट काढताना किंवा दिग्दर्शित करताना सामाजिक न्याय आणि परिवर्तन या दोन themes माझ्या डोक्यात सदैव घोळत असतात.

'सध्या मी तयार करत असलेली 'नक्षलाइटस' ही फिल्म एकाच वेळी documentary आहे आणि fiction ही आहे. माझी खात्री आहे की, ती पाहिल्यावर नक्षलवादी नसलेले म्हणतील की, 'असं झालं असतं तर फार बरं झालं असतं,' आणि नक्षलवादी म्हणतील की, 'हो, हे असंच घडलं.' त्यामुळे माझ्यावर दोन्ही बाजूंनी टीका होण्याची शक्यता आहे. पण मी असत्य असं काही रेखाटलं आहे असं कोणीही म्हणणार नाही, अशी मला आशा आहे.'

के. ए. अब्बासने नक्षलवाद्यांवर एक पुस्तकही लिहिलं असून त्या विषयावरील ते एक मान्यता पावलेलं पुस्तक आहे. त्यामध्येही अब्बास या क्रांतिकारकांच्या मानसशास्त्रावरच अधिक भर देतो. मरणं किंवा मारणं, छळणं किंवा छळ करून घेणं हेच जीवनाचं ध्येय असणाऱ्या नक्षलवाद्यांनी अब्बासला पार झपाटून टाकलं आहे. अब्बास म्हणतो–

'हुतात्म्यांच्या या आदर्शवादी नाट्याने मला त्या विषयाकडे आकृष्ट केलं. कशामुळे किंवा कशासाठी हे हजारो तरुण छळ आणि मृत्यूला आनंदाने सामोरे जातात? त्यांचे हेतू शुद्ध असले पाहिजेत. कारण कोणत्याही नक्षलवाद्याने अमाप संपत्ती जमवल्याचं माझ्या ऐकिवात नाही. नक्षलवाद्यांची ध्येयं आणि व्यक्तिमत्त्वांनी मला प्रभावित केलं आहे. त्यांच्या छळ व मृत्यूच्या कथा वाचून मी काही नक्षलवाद्यांना भेटलो. त्या वेळी फार मोठं दुःख आणि आपल्या आदर्शावरील निस्सीम निष्ठाच मला त्यांच्या डोळ्यात दिसली. या सगळ्याचं पृथक्करण मी माझ्या 'Naxalites' या फिल्ममध्ये करत आहे.'

बरंच काही गमावून फार थोडं पदरात पाडून घेतलेल्या या नक्षलवाद्यांवरील चित्रपटात सुनील लाहिरी, स्मिता पाटील आणि नाना पळशीकर हे प्रमुख भूमिकांमध्ये चमकत आहेत.

*

या चित्रपटाप्रमाणेच कलाजगताशी संबंधित असे इतरही काही प्रश्न अब्बासला विचारण्यात आले. या प्रश्नांची अब्बासने दिलेली उत्तरंही विचार करायला लावणारी आहेत. चित्रपटांचं मानवी जीवनातील function कोणतं या प्रश्नावर अब्बास म्हणाला,

'एखाद्या चांगल्या नाटकाप्रमाणे किंवा कादंबरीप्रमाणे चित्रपटानेही मानवी जीवनातील आणि समाजातील काही मुद्यांवर आपलं लक्ष केंद्रित केलं पाहिजे. तसंच ते अशा तऱ्हेनं चित्रित केलं पाहिजे, की, ज्यामुळे माणसाला इतरांच्या आणि स्वत:च्याही जीवनाची अधिक चांगली जाणीव होईल. अर्थात या मानसशास्त्रीय कामाबरोबरच वर्तमान सामाजिक परिस्थितीतील मानवी जीवनाचे कंगोरे जास्तीतजास्त स्पष्ट करणं हेही चित्रपटांचं काम आहे असं मी समजतो. कारण कोणताही मनुष्य एखाद्या बेटाप्रमाणे एकटाच, सगळ्यापासून अलिप्त राहू शकत नाही. व्यक्ती आणि समाज परस्परांशी जोडलेले असतात. आणि एकमेकांना react ही होत असतात. हे सर्व नोंदणं हे कला साहित्याचं काम आहे आणि सर्व प्रकारच्या कलांचा संगम असणाऱ्या चित्रपटाचं साहित्याशी एक सुसंगत अंतर्गत नातंही असतं असं मी मानतो.'

'सेन्सॉरशिपबद्दल आपलं मत काय आहे?'

माझ्या मते आदर्श समाजवादी समाजात सेन्सॉरची मुळीच आवश्यकता नाही. त्या ठिकाणी जातिवंत कलावंतच कलेवर योग्य व आवश्यक ती नियंत्रणं ठेवू शकतील; पण सध्याच्या धंदेवाईक वातावरणात मला अतिशय कडक पण सुबुद्ध आणि उदारमतवादी सेन्सॉरची गरज आहे असं मला वाटतं. सामाजिक आणि राजकीय स्वरूपाच्या चित्रपटांबद्दल भारतीय सेन्सॉर आता तसं धोरण स्वीकारत असल्याचं जाणवू लागला आहे. Naxalites च्या वेळी त्याची खरी कसोटी लागणार आहे.

*

प्रौढांसाठी असलेले चित्रपट बांद्रयाच्या ड्राइव्ह–इन थिएटरला देऊ नयेत अशी विनंती मुंबईच्या पोलीस कमिशनरांनी चित्रपट-वितरकांना केली आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर एक नवीनच समस्या उभी राहिली आहे.

या थिएटरच्या जवळपासच्या घरांमधून व बंगल्यामधून लहान मुलं खिडकी किंवा बाल्कनीत उभं राहून 'ड्राइव्ह–इन–'च्या पडद्यावर दाखवले जाणारे सिनेमे पाहतात. त्यामुळे हाणामारी किंवा कामुक दृश्य असणारे चित्रपट जर या ठिकाणी दाखवले गेले तर लहान मुलांवर त्याचा वाईट परिणाम होईल अशी तक्रार या भागातील रहिवाशांनी कमिशनरांकडे केल्यामुळे त्यांनी ही विनंती वितरकांना केली आहे.

आता यावर काय तोडगा काढायचा असा पेच सध्या मुंबईतल्या वितरकांना पडला आहे. कारण देशातल्या इतर कोणत्याही थिएटरमध्ये होणाऱ्या या कलेक्शनपेक्षा 'ड्राइव्ह–इन'चं कलेक्शन किती तरी जास्त आहे.

# कुटुंब नियोजन करा

माता, बालक
आणि कुटुंबाच्या
आरोग्यासाठी
आणि
सौख्यासाठी

उशीरा होऊ द्या पहिलं
अंतर सोडून दुसरं
कधीच नको तिसरं

जेव्हा हवं असेल तेव्हाच मूल होऊ द्या

वाढत्या लोकसंख्येस आळा घालण्यासाठी मदत करा

मोफत सल्ला आणि सेवेसाठी
जवळच्या आरोग्य केंद्रात जा.

davp 79/230

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

PADMAJA/M

# अक्षय सुखाच्या चिरंतन ओळी




महाबँकेच्या आवर्त ठेव योजनेच्या तुमच्या
पासबुकाच्या प्रत्येक पानावरील या ओळी म्हणजे
तुमच्या भविष्यातील अक्षय सुखाची ग्वाहीच!
या योजनेमध्ये तुम्ही दरमहा पांच रुपयांपासून
बचत करु शकता.

**महाबँक आवर्त ठेव योजना म्हणजे बचतीचा उत्तम मार्ग!**

**बँक ऑफ महाराष्ट्र**

(भारत सरकारचा उपक्रम)

मुख्य कार्यालय : पुणे

बँकिंग सेवा

व्यक्तिगत जिव्हाळा